**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदाणी, : अपिलार्थी
मु. पो. पाचपिंपळगल्ली, दक्षिण मारोती मंदिराच्या बाजुला,
पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कृषि चिकित्सालय,
आष्टी, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, आष्टी, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदाणी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कृषि चिकित्सालय,<br>आष्टी, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, आष्टी, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०३-२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २६-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुध्दा अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०१-२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्याची कारवाई चालू आहे, माहिती प्राप्त होताच आपणास देण्याची दक्षता घेण्यात येईल असे कळविल्याचे दिसून येत आहे.तथापि अद्यापपर्यंत त्यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) चा भंग झाला आहे,याकरिता त्यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सह संचालक, कृषि, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी सह संचालक, कृषि, औरंगाबाद यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कृषि चिकित्सालय, आष्टी, जिल्हा बीड यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सह संचालक, कृषि, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदाणी, मु. पो. पाचपिंपळगल्ली, दक्षिण मारोती मंदिराच्या बाजुला, पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कृषि चिकित्सालय, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सह संचालक, कृषि, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माधव भुजंग दामरे, : अपिलार्थी
रा. राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी, सजा राणीसावरगांव, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/६५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माधव भुजंग दामरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०३-२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २२-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना मागील सुनावणीनंतर जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांच्याकडून माहिती मिळाली आहे. त्याबाबत त्यांचे समाधान झाले आहे, तथापि त्यांना माहिती ३१८ दिवस उशिराने मिळाली आहे याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांनी आयोगास दिनांक १५-११-२०११ च्या पत्राने कळविले आहे की, माधव भुजंग दामरे, रा. राणी सावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांनी माहिती अधिकार अर्जात मागवलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे व प्रकरण निकाली काढावे असे त्यांनी कळविले आहे, त्या पत्राची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी सदर प्रकरण बंद करावे ही विनंती.

अपिलार्थी यांचे दिनांक ०९-११-२०११ चे राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेले पत्र आयोगा-समोर आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, मी तलाठी सज्जा राणीसावरगांव व तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड यांना प्रतिपक्षी करुने दाखल केलेल्या अपिलात दिनांक २३-११-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता सुनावणीस उपस्थित राहावे अशी नोटीस मला प्राप्त झाली आहे, परंतु मला हवी असलेली माहिती कागदपत्रासह दिनांक ०३-०८-२०११ रोजी प्राप्त झालेली आहे, करिता मी दाखल केलेले अपील निकाली काढणेत यावे हि विनंती.

अपिलार्थी यांनी आयोगास अपील निकाली काढण्याचे लेखी स्वरुपात कळविले असूनही आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना दंड लावण्याची विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली आहे ही बाब विचारात घेता प्रकरण या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधव भुजंग दामरे, रा. राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा राणीसावरगांव, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिंदे बालासाहेब बन्सीधर,<br>रा. कानसूर, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कानसूर,<br>तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| २ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी,<br>जिल्हा परभणी | : | |
| ३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कानसूर,<br>तालुका पाथरी, जिल्हा परभणी - श्री. शिंदे ए. आर. | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथरी,<br>जिल्हा परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद,<br>परभणी - श्री. अशोक सिरसे | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २०-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०५-०३-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०२-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. तथापि विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथरी उपस्थित होते. त्यांनी प्रकरणातील सद्यस्थिती आयोगासमोर सादर करण्याकरिता पुढील तारीख देण्याची विनंती केली होती ती मान्य करुन त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजीही सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना संधी देण्यात आली होती तथापि आज रोजीही ते अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २२-१२-२००९ च्या माहितीच्या अर्जान्वये ऑक्टोबर २००५ ते डिसेंबर २००९ या कालावधीची बारावा वित्त आयोग, पाणीपुरवठा, तांडावस्ती, दलितवस्ती व ग्रामनिधी जनरल किर्द या मुद्दयांच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली आहे. या माहितीची एकूण २२८ पृष्ठे होत असून त्यासाठी आवश्यक रुपये ४५६ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०१-२०१० रोजी कळविले आहे. सदरचा माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक २२-१२-२००९ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथरी यांच्याकडून प्राप्त झाला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीनंतर दिनांक ०५-०२-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना हवी असल्यास आवश्यक रकमेचा भरणा करुन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कानतूर यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी व अपिलार्थीचे अपील अमान्य केले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी आजपर्यंत शुल्काचा भरणा केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी शुल्काचा भरणा करावा असे जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, परभणी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अवगत केले आहे. या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंदे बालासाहेब बन्सीधर, रा. कानसूर, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कानसूर, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बनसोडे भोजाजी एकनाथराव, : अपिलार्थी
रा. पिंपळगाव (बा), पो. काल्लेश्वर, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा :
सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

३ जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२६

२ सुनावणीची तारीख दि. २३-११-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. बनसोडे भोजाजी एकनाथराव त्यांचे वकील श्री. रंगनाथ जळबाजी साखरे यांचेसह : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. ए. बी. चव्हाण : उपस्थित

३.३ जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. एस. आर. भाग्यवंत त्यांचे वकील श्री. महेश सोनवणे यांचेसह : उपस्थित

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. पी. एस. राठोड : उपस्थित

३.५ विशेष साक्ष : विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, श्री. व्हि. एस. साहोत्रे : उपस्थित

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०४-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०३-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे वकील श्री. रंगनाथ जळबाजी साखरे यांचेसह, संबंधित जन माहिती अधिकारी त्यांचे वकील श्री. महेश सोनवणे यांचेसह, जन अपिलीय अधिकारी आणि विशेष साक्षीसाठी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांचेतर्फे त्यांचे वकील श्री. महेश सोनवणे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सोसायटी ॲक्टप्रमाणे सोसायटी सभासदाला उपलब्ध होऊ शकते,तथापि अपिलार्थी हे सोसायटीचे सभासद नाहीत त्यामुऴे त्यांना हि माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. या सोसायटीमध्ये २५० सभासद आहेत. अपिलार्थी यांनी या सर्व सभासदांनी या संस्थेची १९५८ मध्ये स्थापना झाल्यापासून उचललेल्या कर्जाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१. सोसायटीचे एकूण सभासद शेअर्सधारक झाल्यापासून प्रत्येक वर्षी सोसायटीने केलेल्या शेअर्स कपातीबाबत माहिती मागितली आहे.

२. प्रत्येक सभासदाने प्रत्येक वर्षी किती कर्ज उचलले व किती वसूल करण्यात आले त्याचा तपशील मागितला आहे.

३. प्रत्येक सोसायटी सभासदाच्या शेअर्स रजिस्टरच्या ताळेबंद पत्रकाचा उतारा मागितला आहे.

४. सोसायटीच्या स्थावर मालमत्तेविषयीची माहिती मागितली आहे.

या सोसायटीस शासनाचे कोणतेही अनुदान नाही किंवा शासननिधी प्राप्त झाला नाही,. तसेच या सोसायटीवर शासनाचे नियंत्रण मर्यादित आहे, त्यामुळे सोसायटीस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी व्यक्तिगत माहिती मागितली आहे त्याचा शासनाशी संबंध नाही.

जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, श्रेणी-१,कार्यालय सहायक निबंधक ,सहकारी संस्था,पूर्णा,जिल्हा परभणी यांच्याकडे अपिलार्थीने दिनांक ९-१२-२००९ रोजी केलेला माहिती अर्ज त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५च्या कलम ६(३) नुसार सोसायटीच्या सचिवांकडे वर्ग केला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक ,सहकारी संस्था,पूर्णा यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जी व्यक्तिगत माहिती आहे ती वगळून उर्वरित माहिती देण्यात यावी असा निर्णय दिला आहे.

अपिलार्थी तर्फे त्यांचे वकील श्री. रंगनाथ जळबाजी साखरे यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, सदरच्या सोसायटीस केंद्र आणि राज्य शासनाकडून सुमारे साडेतीन ते चार लाख रुपये कर्जमाफीसाठी मिळाले आहे. यापैकी संस्थेची वगळून उर्वरित रक्कम सभासदांना मिळाली आहे .सदर सोसायटीस शासनाकडून मदत मिळाली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५या सोसायटीस लागू होतो त्यामुळे अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्यात यावी.

विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, श्री. व्हि. एस. साहोत्रे यांनी त्यांच्या विशेष साक्षीमध्ये आयोगास अवगत केले की, सोसायटीला केवळ कर्जमाफीची रक्कम मिळाली आहे.इतर कोणतेही शासन अनुदान या सोसायटीला मिळत नाही किंवा या सोसायटीवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही,त्यामुळे सदर सोसायटीला माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, तथापि मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे की, सोसायटी ॲक्ट १९६० अन्वये सभासदाला माहिती पुरवता येऊ शकते,परंतू अपिलार्थी हे सोसायटीचे सभासद नाहीत त्यामुळे ही माहिती त्यांना देय होणार नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, संबधित सोसायटीला माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा दिनांक ०९-१२-२००९ रोजीचा अर्ज सहायक निबंधक, सहकारी सस्था पूर्णा यांच्या कार्यालयाकडे केला आहे. ही बाब आयोग विचारात घेत आहे व माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाच्या केलेल्या व्याख्येचा विचार करता सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा यांच्या कार्यालयात संस्थेच्या कायद्यानुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती उपलब्ध होऊ शकते फक्त तीच अपिलार्थीस देय होत आहे. इतर माहिती नाही. तसेच त्रयस्थाची जी माहिती मागितली आहे ती माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) नुसार देय होणार नाही. याकरिता जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, श्रेणी-१,कार्यालय सहायक निबंधक ,सहकारी संस्था,पूर्णा,जिल्हा परभणी यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सोसायटीच्या वार्षिक ताळेबंदची प्रत अपिलार्थीस द्यावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित देय होणारी माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बनसोडे भोजाजी एकनाथराव, रा. पिंपळगाव (बा), पो. काल्लेश्वर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.
२. जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिवाजी कचरु दिपके,<br>रा. पिंपळगांव (बा), पो. काल्लेश्वर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| २ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | |
| ३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहकार अधिकारी श्रेणी-१, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. ए. बी. चव्हाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. एस. आर. भाग्यवंत | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी - श्री. पी. एस. राठोड | : | उपस्थित |
| ३.५ | विशेष साक्ष : विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, श्री. व्हि. एस. साहोत्रे | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १५-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १८-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०९-०४-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०३-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व संस्थेचे प्रतिनिधी यांची बाजू ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी आणि विशेष साक्षीसाठी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १४-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये वि. का. से. सो. पिंपळगांव (बा.) येथील सभासदांना केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यामार्फत मिळालेल्या कर्जमाफीची यादी व ज्यांना कर्ज माफी मिळाली नाही त्यांची यादी मागितली आहे. सदरचा अर्ज त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) नुसार संबंधित संस्थेकडे वर्ग केलेला आहे. शासनातर्फे कर्जमाफीचा निधी प्राप्त झाला असल्यामुळे या याद्या त्यांनी पूर्वीच तयार ठेवल्या आहेत. अपिलार्थी माहिती व्यक्तिशः घेणार आहेत असे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद केले आहे, तथापि त्यांनी तसा प्रतिसाद दिलेला नाही, त्यामुळे त्यांना माहिती देता आलेली नाही.

विशेष साक्षीदार विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, श्री. व्हि. एस. साहोत्रे यांनी आयोगास अवगत केले की, सदरची माहिती यापूर्वीच शासनातर्फे प्रसिध्द करण्यात आल्यामुळे देय आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची आज संधी देण्यात आली होती, तथापि ते आजही अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २३-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी कचरु दिपके, रा. पिंपळगांव (बा), पो. काल्लेश्वर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, पिंपळगांव (बा), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विलास विष्णूदास मोरे,<br>मु. पो. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी - ज्योती पवार | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| | - प्रतिनिधी - श्री. आर. के. कोलगणे, नायब तहसीलदार (महसूल) | | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०४-२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०३-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि आजही पुन्हा ते अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०१-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ जानेवारी २००८ ते माहिती अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीची विविध मुद्यावर तहसील कार्यालय, परभणी यांच्याकडे परभणी जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानाबाबतची तसेच तहसीलदाराच्या दैनंदिनीच्या प्रती, तहसील कार्यालयाकडे किती शासकीय वाहने होती, वाहनासाठी महिनानिहाय किती खर्च आला, गाडीच्या लॉगबुकच्या प्रती, पुरवठा विभागासाठी वाहनावर केलेला खर्च त्याचप्रमाणे कलम ४ मधील १७ कामांची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की,अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये २३५ स्वस्त धान्य दुकानांची माहिती समाविष्ट आहे,त्यामुळे या माहितीची व्याप्ती प्रचंड आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या प्रमाणावर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे.हि बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे.केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहेत.

तहसीलदार यांनी सांगितले की, अपिलार्थी यांना माहिती पाहण्याची संधी दिली होती.तथापि अपिलार्थीने प्रतिसाद दिला नाही. या सर्व बाबींवर जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना दिनांक १५-०२-२०१० रोजी विचार करणे आवश्यक ठरत होते. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची

अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णूदास मोरे, मु. पो. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. चौधरी मोहम्मद मोईनोद्दीन गौस मनियार,<br>रा. नेहरु चौक, उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. शर्मा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२७-११-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २२-०३-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक २७-०५-२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्या सुनावणीच्या वेळी पुन्हा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यामुळे दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजीच्या सुनावणीस तिस-यांदा अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना उपस्थित राहण्याचे सूचित करण्यात आले होते, तथापि निवडणुकीच्या कामामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित राहू शकत नाहीत म्हणून त्यांनी सुनावणीस पुढील तारीख देण्याची त्यांनी त्यांच्या दिनांक १९-११-२०११ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. तथापि या प्रकरणात तिस-यांदा संधी दिली असल्याकारणाने पुन्हा सुनावणी घेणे आयोगास योग्य वाटत नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्रयस्थ नगरपरिषद कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती व त्यांच्या कुटूंबाची माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (ड) (त्र) नुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर आधारीत नसल्यामुळे देय होत नाही. उर्वरीत मुद्दयावरील माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याचे त्यांच्या व्दितीय अपिलावरुन दिसून येत आहे. तथापि त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलात माहिती अपूर्ण व चुकीची दिली आहे असे मोघमपणे नमूद केले आहे व त्यांना कोणती माहिती अपेक्षित आहे हे नेमके नमूद केलेले दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चौधरी मोहम्मद मोईनोद्दीन गौस मनियार, रा. नेहरु चौक, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती अन्नपूर्णा भगवान सिगेदार, : अपीलकर्ता
व्दारा, श्री.अरुण देवळे,
देवळे जिनिंग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी<br>- श्री. रमेश सुदाम बरकते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद,<br>परभणी - श्री. अशोक सिरसे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७-१२-२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०-०१-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०३-०३-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०१-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. संचिका उपलब्ध होत नसल्यामुळे माहिती दिली नाही म्हणून दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली तेव्हा अपिलार्थीस रुपये ४९१ इतक्या शुल्काचा भरणा करावा, म्हणजे माहिती पाठविण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला होता. तथापि अपिलार्थी यांनी सदर शुल्काचा भरणा करुन त्यांना माहिती प्राप्त झाली किंवा कसे याचा बोध होत नसल्याकारणाने अपिलार्थीस दिनांक ०३-०६-२०११ रोजी नोंदणीकृत टपालाने विनामूल्य माहिती पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी मागील झालेल्या सुनावणीस अनुपस्थित होते त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या स्तरावर प्रकरण बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान सिगेदार, व्दारा, श्री.अरुण देवळे, देवळे जिनिंग, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वामन रंगनाथराव मोरे,<br>बी-१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी - प्रतिनिधी - श्री. आर. के. कोलगणे, नायब तहसीलदार, परभणी | | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी - श्री. पी. पी. वाकोडकर, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०३-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२६-११-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०१-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि ते आजही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०३-०७-२००८ च्या माहितीच्या अर्जान्वये दिनांक ०१-०७-२००८ व ०२-०७-२००८ या कालावधीची कार्यालयाच्या लेखनी बंद कार्यक्रमाबाबत एकूण सात मुद्दयावर माहिती मागितली आहे. ब-याच मुद्दयावर प्रश्नार्थक माहिती मागितली असून, काही मुद्दयावर खुलासा मागितल्याचे आढळून येत आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, तथापि जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी परभणी यांनी दिनांक २१-०३-२००९ रोजी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविली आहे. त्याचा तपशील त्यांच्या दप्तरी दाखल आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता या स्तरावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे विहित मुदतीत माहिती देण्यात येईल याबाबत त्यांनी भविष्यात सतर्क रहावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी-१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१२-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०१-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही उपस्थित नव्हते. तहसीलदार, पूर्णा यांनी दिनांक ०१-०६-२०११ च्या पत्रान्वये आयोगास सुनावणीमध्ये तारीख वाढवून देण्याची विनंती केली होती ती मान्य करुन आज रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुध्दा अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-०५-२००९ च्या माहिती अर्जान्वये ऑगस्ट २००८ ते एप्रिल २००९ या कालावधीत पूर्णा तालुक्यात रेशनची साखर वाटप केली असेल तर तालुक्यातील रेशन दुकानदाराचे नाव, गाव, पत्ता त्यांना दरमहा दिलेल्या कोट्यासह यादी, तालुक्यातील किरकोळ दुकानदारांनी साखर कोटा कोणत्या कार्डधारकांना वाटप केला, त्या वाटप केलेल्या वाटप रजिस्टरच्या छायांकीत प्रती, तालुक्यातील रेशन साखरेचे घाऊक विक्रेत्याचे नाव, पत्ता, त्यांच्या स्टॉक बुक व वाटप रजिस्टरच्या छायांकीत प्रती इत्यादीची संपूर्ण तालुक्यातील विस्तृत माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात माहिती विचारली असता ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे,हि बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे. केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची दोन वेळेस संधी देण्यात आली होती तथापि ते अनुपस्थित होते. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती दिली नसल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात माहिती पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप राधाकिशन मोगल, : अपिलार्थी
रा.कुंडी, ता.सेलू, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०५.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०७.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जिल्हाधिकारी,हिंगोली यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी,हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०१.०४.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप राधाकिशन मोगल, रा.कुंडी, ता.सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक हरिभाऊ कऱ्हाळे, रा.परभणी : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
सह जिल्हा निबंधक वर्ग-१(नि.श्रे.)परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अशोक हरीभाऊ कऱ्हाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सह दुय्यम निबंधक वर्ग-२, परभणी- श्री. एम.एन.गुळवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),परभणी - श्री. एस.के.बोधगिरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०१० |

२) या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०७.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित नव्हते. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थीची बाजू ऐकून घेण्यासाठी प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज दि. २३.११.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

३) सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर मुद्देनिहाय युक्तिवाद खालीलप्रमाणे सादर केला.

३.१) मुद्दा क्र. १ मध्ये मागणी केलेले दस्तऐवज त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. त्यातून त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे ते दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नियमानुसार शुल्क भरुन घेण्यास तयार आहेत. तथापि त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत अर्ज सादर केलेला आहे व त्यांना विहित मुदतीत म्हणजे एक महिन्यात माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांना ही पाहणी विनामूल्य देण्यात यावी.

३.२) मुद्दा क्र. २ मध्ये मुद्दा क्र.१ च्या नकलेचा भाग आहे, ती माहिती देण्यात यावी.

३.३) मुद्दा क्र.३ : दि. ०१.०१.१९८४ ते ३१.०३.१९८४ - यातील उपमुद्दे 'ए' व 'बी' ची माहिती त्यांना मिळालेली आहे. 'सी' व 'डी' ची माहिती दिलेली नाही.

मुद्दा क्र. ३ 'सी'ची माहिती वरीलप्रमाणे मिळावी म्हणजे वरीलप्रमाणे पाहणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. एक महिन्यात निर्णय न दिल्यामुळे पाहणी व नक्कल विनामूल्य देण्यात यावी.

मुद्दा क्र. डी - वरीलप्रमाणे.

३.४) मुद्दा क्र. ४ : अपिलार्थी यांनी अधिनियमातील कलम ४(१)(ख) मधील १७ मुद्यांची माहिती मागितली आहे. तथापि त्यांना कलम ४(१)(ब) ची माहिती देण्यात आली आहे. यासाठी त्यांनी ₹४२/- चा भरणा केला होता. त्यांना ही रक्कम परत करण्यात यावी.

४) जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू आयोगापुढे सुनावणीच्या वेळी खालीलप्रमाणे मांडली आहे.

४.१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १५.०१.२०१० रोजीच्या अर्जावर दि. ०९.०२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद दिला आहे.अपिलार्थीच्या दि. १७.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ११.०३.२०१० रोजी सुनावणी घेतली असून दि. १९.०३.२०१० रोजी निर्णय पारित केला आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),परभणी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

"माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक यांनी दिलेली माहिती पुरेशी व योग्य आहे.तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१) ख प्रमाणे एक ते सतरा

बाबतची माहिती प्रसिध्द करण्यास विलंब झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात आली आहे व कलम ४(१) ब नुसार संचिकेची पाहणी करण्यासाठी पहिल्या तासाकरिता कोणतीही फी नाही त्यानंतरचे प्रत्येक पंधरा मिनीटाकरिता किंवा त्यांच्या भागाकरिता पाच रुपये याप्रमाणे फी आहे. सह दुय्यम निबंधक,वर्ग-२,परभणी यांनी १ ते १७ मुद्यांबाबतच्या माहितीत योग्य दुरुस्ती करुन पक्षकारास विनामुल्य माहिती देण्यात यावी. सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांनी वेळेत माहिती दिली असल्याकारणाने अपिलार्थी यांनी शासन भरणा केलेली ₹४२/- ही रक्कम परत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही."

४.२) जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांच्या विभागाने अभिलेखांची पाहणी करण्यासाठी जे दर निश्चित केले आहेत, त्याप्रमाणे शुल्काचा भरणा अपिलार्थी यांनी करावा व तदनंतर आवश्यक असल्यास नक्कल प्राप्त करुन घ्यावी. अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या कलम ४(१)(ख) यातील मुद्दा क्र. १ ते १७ ची उपलब्ध माहिती ₹४२/- शुल्काचा भरणा केल्यानंतर देण्यात आली आहे. ही माहिती देताना नजरचुकीने ४(१)(ख) ऐवजी ४(१)(ब) असा उल्लेख झालेला आहे.

५) आयोगापुढे झालेल्या युक्तिवादावरुन खालील बाबी उपस्थित झाल्या आहेत व त्यावरील राज्य माहिती आयोगाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

५.१) "अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी कोणत्या दराने द्यावी. "

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीअंतर्गत निश्चित केलेल्या दराने माहिती द्यावयाची आहे. कलम ७ (५) नुसार फक्त दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना निशुल्क माहिती द्यावयाची आहे. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. माहिती अधिकार अधिनियमामधील कलम २७(२) अन्वये तयार केलेल्या महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मध्ये शुल्क निश्चित केलेले आहे व कलम ४ नुसार विभागाने निश्चित केलेल्या दरानुसार माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(ञ) नुसार 'माहितीचा अधिकार' या व्याख्येमध्ये विविध पर्याय येतात. त्यातील पहिला पर्याय माहितीची पाहणी असा आहे. त्यानंतरचा क्रम टिप्पण्या/उतारे घेणे व त्यानंतरच्या क्रमवारीनुसारचा पर्याय छायाप्रतींच्या स्वरुपात माहिती घेणे असा आहे. कलम २(च) नुसार 'माहिती'ची व्याख्या देण्यात आली असून त्यानुसार कोणत्या बाबी 'माहिती'मध्ये मोडतात, हे स्पष्ट करण्यात आले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार माहिती देण्याकरिता शुल्क घेण्यात यावे, अशी तरतुद असून शुल्काचा तपशील कलम ७(३) नुसार कळविणे आवश्यक आहे. माहितीची व्याख्या (कलम २(च)), माहितीचा अधिकार (कलम २(ञ)) हे माहिती अधिकार अधिनियम,२००५मध्ये निश्चित केलेला आहेत. माहितीच्या अधिकारात माहितीची पाहणी सुध्दा येत आहे. माहितीची पाहणी देणे हा ही एक पर्याय आहे. त्यामुळे माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली असेही होते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २७(२) नुसार तयार केलेल्या महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील कलम ४(१) मध्ये माहिती द्यावयाचा दर निश्चित केला आहे.

त्यामध्ये कलम ४(१)(अ)(क) मध्ये संबंधित विभागाने निश्चित केलेल्या दराने माहिती द्यावयाची आहे, असे नमूद केले आहे. आता माहिती देणे म्हणजे माहितीची पाहणी देणेसुध्दा माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे होते. त्यामुळे माहितीची पाहणी देण्याचा दर विभागाने निश्चित केला असल्यास त्या दराने माहिती देय होते. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील माहितीच्या अर्जान्वये माहिती मागितली असल्यास त्या प्राधिकरणाने माहिती पाहणीचा दर निश्चित केला असेल तर त्या दराने माहितीची पाहणी देणे आवश्यक आहे. यामुळे या प्रकरणात अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद आयोगास मान्य करता येत नाही. विभागाने निश्चित केलेल्या दराने त्यांना शुल्काचा भरणा करुन माहितीची पाहणी घेणे आवश्यक ठरत आहे व तदनंतर काही कागदपत्रांच्या प्रती आवश्यक असल्यास त्यासुध्दा प्राधिकरणाने दर निश्चित केला असल्यास त्या दराने सशुल्क प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

५.२) "अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती बहुतांशी त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्यासाठी कलम ७(७) व ११ नुसार संधी देण्यात यावी किंवा कसे."

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अर्ज प्राप्त झाल्यास अधिनियमातील तरतुदी विचारात घेणे आवश्यक आहे. त्रयस्थांची माहिती असल्यास नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून कलम ७(७) व कलम ११ नुसार त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तदनंतर त्रयस्थांची बाजू विचारात घेऊन कलम ११ व ८ मधील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या कसोटीवर माहिती देणे उतरत असल्यास माहिती देणे योग्य ठरते.

६) आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रे यांचा साकल्याने विचार करता आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांची पाहणी व त्यातील काही आवश्यक कागदपत्रे छायाप्रतीच्या स्वरुपात देण्याकरिता विभागाने निश्चित केलेल्या दरानुसार शुल्क आकारण्यात यावे इतर कागदपत्रांसाठी पाहणी तसेच छायांकित प्रतींकरिता माहिती अधिकार नियम २००५ नुसार दर लावण्यात यावा. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठया प्रमाणावर असल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरु शकतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट कसे सफल होईल, हा प्रश्न उद्‌भवू शकतो. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. उपलब्ध माहितीच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती एका महिन्याच्या आत देणे शक्य नव्हते व उपलब्ध आहे ती माहिती दिलेली आहे. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांनी शुल्क ₹४२/- स्वीकारलेले आहे. त्यामुळे

₹४२/- शुल्क परत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.अत: अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा केल्यास माहितीचे अभिलेखे पाहणीसाठी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावेत व आवश्यक माहितीच्या प्रती सशुल्क देण्यात याव्यात. माहितीच्या प्रती देण्याबाबत माहिती त्रयस्थांची असल्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे त्रयस्थांची बाजू ऐकून घेऊन माहिती देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, परभणी यांनी अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे माहिती देण्याची कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** | **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** | **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक हरिभाऊ कऱ्हाळे,रचनानगर, कारेगाव रोड, परभणी - ४३१ ४०१

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, वर्ग-१ (नि.श्रे.),परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुलाम अहमद पिता गुलाम मुर्तजा, : अपिलार्थी
रा.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्रशाला, वालूर,
ता. सेलू, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,जिल्हा परिषद प्रशाला, वालूर,ता. सेलू, जि.परभणी - श्री. वायाळ रोहिदास रुस्तुमराव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.परभणी - श्री. अशोक इ. आठवले | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०६.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०७.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),जि.प.परभणी यांनी या प्रकरणी वैयक्तिक लक्ष पुरविणे आवश्यक वाटल्यामुळे त्यांच्या विशेष साक्षीकरिता प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज दि. २३.११.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, वालूर, ता.सेलू, जि.परभणी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी पूर्वी काही कालावधीकरिता त्यांच्या शाळेमध्ये कार्यरत होते. त्यांच्या सेवापुस्तिकेबाबतची मागितलेली माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या संचिकेवरुन देण्यात आली आहे. या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, परभणी श्री. आठवले यांना विशेष साक्षीकरिता पाचारण केलेले होते. अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीपैकी कोणती माहिती देण्यात आली व देय होत असलेली माहिती कोठून प्राप्त होऊ शकते, या बाबत जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी अपिलार्थीच्या सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यात आल्या असून त्याची एक प्रत त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ती प्रत आता ते अपिलार्थीस पाठवित आहेत. अपिलार्थी यांची बदली झाली असल्याकारणाने त्यांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत उर्वरित माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. यासाठी समाजकल्याण अधिकारी कार्यालयात अपिलार्थीने स्वतंत्र अर्ज करणे उचित होईल, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली अपिलार्थीच्या सेवापुस्तिकेची प्रत त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम अहमद पिता गुलाम मुर्तजा, रा,आखाडा मोहल्ला, मेनरोड पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, वालूर, ता.सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मीकांत गणपतराव देशपांडे,<br>रा. बामणी (बु.), ता.जिंतूर, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., जिंतूर,<br>जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/७९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अभियंता, जिंतूर उपविभाग,जिंतूर म.रा.वि.वि.कं.मर्या.,जिंतूर,जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, मंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या.,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. रंधे के.एस.सहायक अभियंता,मंडळ कार्यालय,म.रा.वि.वि.कं.मर्या.,परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९.०७.२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०९.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी व्यक्तिशः उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना दि. २०.०६.२०११ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्यात आली होती. तथापि ते अनुपस्थित आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत गणपतराव देशपांडे, मु.पो.बामणी (बु.), ता.जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, जिंतूर उपविभाग,जिंतूर म.रा.वि.वि.कं.मर्या.,जिंतूर,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या.,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पवार अनिल उत्तमराव, : अपिलार्थी
रा.गंगाखेड, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
१) तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी
२) तहसीलदार, तहसील कार्यालय,गंगाखेड,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पवार अनिल उत्तमराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - १)तहसीलदार(महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी व २) तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी क्र.१ व २ यांचे प्रतिनिधी अनुक्रमे श्री. एम. एस.शिनगारे,अ.का.,जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी व श्री. एम.व्ही.दलाल, नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. वाकोडकर, अ.का.,जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.१०.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी क्र.१, २ व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी दि. १०.०५.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या ०७.०५.२०१० रोजी जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयामध्ये दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली याची दि. ०७.०५.२०१० पासून पत्राचे उत्तर देईपर्यंतच्या कालावधीतील कागदपत्रांची माहिती मागितली आहे. या पत्रामध्ये त्यांना पुराव्यापोटी दिलेल्या कागदपत्रांसंदर्भात पुढे काय कार्यवाही केली, ही माहिती अपेक्षित आहे. तथापि त्यांना आजपावेतो माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलामध्ये माहिती द्यावी, असा निर्णय दिला. तथापि त्यांना जी माहिती प्राप्त झाली, ती योग्य नाही, असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले.

अपिलार्थी यांच्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांनी खालील मुद्दे मांडलेले दिसून येत आहेत.

"१) माहितीचा कालावधी दि. ०७.०५.२०१० नंतरचा असताना माहिती दि. ०३.०५.२०१० पूर्वीची म्हणजेच चुकीची, दिशाभूल करणारी दिली.

२) श्री. पवार यांच्यावर गुन्हा दाखल केलेला असताना गुन्हा दाखल झाल्यानंतर दि. ०७.०५.२०१० च्या माझ्या अर्जात खरे आरोपी विषयी कागदी प्रमाणित पुरावा दिल्यानंतर काय केले याची माहिती विचारली असता श्री. पवार यांच्यावर गुन्हा कशा पध्दतीने दाखल केला याची माहिती दिली. म्हणजेच चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली.

३) अपर जिल्हाधिकारी साहेबांनी अपील मान्य करुन दोषींना शिक्षा/दंड करण्याऐवजी परत १५ दिवसांचा अवधी दिला व दंड (नियमाप्रमाणे) काहीच नाही.

४) अपील मान्य होऊनही व माहिती देण्याचा आदेश होऊन तसेच परत १५ दिवसांचा अवधी मिळूनही चुकीची माहिती देण्यात आली."

तहसीलदार, गंगाखेड यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०८.२०१० रोजी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्यात यावी. दि. २७.०८.२०१० रोजीच्या पत्रान्वये महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांनी अपिलार्थीस माहिती

पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देताना अधिनियमातील कलम ८ व १० खाली कोणती माहिती देता येत नाही, याबाबत त्यांचे अभिप्राय दिलेले आहेत. त्याचप्रमाणे असेही आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी कोणतीही चौकशी प्रलंबित नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीने उपरोक्तप्रमाणे मागणी केलेली माहिती देय होत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलामध्ये माहितीसंदर्भात जी कारणमिमांसा दिली आहे, यासंदर्भात भविष्यात जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती पुरविण्याकरिता सतर्क राहणे आवश्यक राहील.

आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.दि. १३.१२.२०११ ही तारीख कागदपत्रांच्या पाहणीसाठी निश्चित करण्यात आली, ती अपिलार्थीस मान्य आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी (माहितीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून आजपावेतो कालावधीची) संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे दि. १३.१२.२०११ रोजी सकाळी ११.०० ते सायं.०५.०० पर्यंत उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवार अनिल उत्तमराव, यु.एस.पवार यांचे घर, योगेश्वर कॉलनी, गंगाखेड, ता.

गंगाखेड,जि.परभणी - ४३१ ५१४.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. स.महेमुद अली अमिर अली,<br>रा.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक, सहकाी संस्था, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.११.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी व्यक्तिशः उपस्थित नव्हते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता तसेच प्रकरणात अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे यांच्या विशेष साक्षीसाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच अपर निबंधक, सहकारी संस्था पुणे यापैकी कोणीही उपस्थित नाही. अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे यांच्यामार्फत सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती आयोगास करण्यात आली.ती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स.महेमुद अली अमिर अली, रामेश्वर नगर,मराठवाडा प्लॉट,परभणी -४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अपर निबंधक, सहकारी संस्था,पुणे, मध्यवर्ती इमारत,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सौ. शिला दत्तात्रय शेटे,<br>रा.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>स्वच्छता निरीक्षक,<br>नगर परिषद कार्यालय,परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - स्वच्छता निरीक्षक,नगर परिषद कार्यालय,परभणी - श्री. करण स.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. मधुकर डहाळे, अरेखक, न.प.परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०३.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १४.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी, जनअपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते व अपिलार्थी अनुपस्थित होत्या.त्यांनी दि. १३.०६.२०११ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास केलेली विनंती मान्य करुन आयोगाने प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्याचा अंतरिम निर्णय घेतला होता. तथापि सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले होते की, अपिलार्थी यांनी दि. २७.११.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दि. १०.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी संधी देण्यात आली होती. तथापि त्या आज रोजी देखील अनुपस्थित आहेत. उपरोक्त कागदपत्रांवरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. शिला दत्तात्रय शेटे,रेणूका माता मंदीर, शनिवार बाजार,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक,नगर परिषद कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालाजी किसनराव शिंदे, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक,नांदेड विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड. सुभाष दत्तराव तारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शेख एन.आय.विज्ञान सल्लागार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १४.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी यांचे वकील उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही

उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, त्यांचे वकील व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी दहा मुद्यांवर माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. त्यापैकी काही माहिती त्यांना मिळाल्याचे दिसून येत आहे. माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात आहे याकरिता जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, नांदेड यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी किसनराव शिंदे, आर्यवृत्त कॉलनी, प्लॉट नं.१५, जिंतूर रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आरेफखान पि.नवाज खान पठाण, : अपिलार्थी
रा.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,पालम,जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, पालम, जि.परभणी - श्री. एम.आर.प्रत्येकी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १६.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी व्यक्तिशः उपस्थित नव्हते.

त्याचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. तदनंतर प्रकरणात आज दि. २३.११.२०११ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पालम, जि.परभणी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी फेरफार क्र. ४१६ मौ. पालम याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती दि. १३.०१.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितल्या आहेत. त्यानुसार कागदपत्रे तलाठी, सजा पालम यांच्याकडे उपलब्ध होत नसल्याकारणाने अपिलार्थीस माहिती देता येऊ शकली नाही. संचिकेचा शोध घेण्याची कार्यवाही झालेली आहे. यावर आयोगाचे निदेश आहेत की, दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन संचिकेचा शोध घेण्यात यावा. नस्ती न सापडल्यास संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पालम, जि.परभणी यांनी दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन वर नमूद केल्याप्रमाणे संचिकेचा शोध घेऊन अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) तहसीलदार,पालम यांनी वर नमूद केल्याप्रमाणे नस्ती न सापडल्यास संबंधित जबाबदार कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी अधिनियमातील कलम २०(२) प्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २३-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आरेफ खान पि.नवाज खान पठाण, रा.पठाण गल्ली,पालम, ता.पालम,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,उपविभागीय अधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नितीन माणिकराव देशमुख,<br>रा. परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>१) नायब तहसीलदार, परभणी<br>२)तलाठी, सजा असोला, ता.जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २३-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,परभणी - श्री. आर.के.कोलगणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी -तलाठी, सजा असोला, ता.जि.परभणी - श्री. जीवन कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.५ | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १६.०६.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना विशेष साक्षीसाठी बोलावण्यात यावे, असे निदेश देऊन आयोगाने अंतरिम आदेश दिले होते. तदनंतर प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी, परभणी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित राहू शकले नाहीत. तथापि त्यांनी सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती आयोगास केली आहे.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुनश्च् पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २३-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन माणिकराव देशमुख, द्वारा ॲड. झरीकर, नारायण चाळ, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा असोला, ता.जि.परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाष मोतीलालजी पारिक, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव (मंत्री),
राजस्थानी वि.प्र.मंडळ, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, राजस्थानी वि.प्र.मंडळ,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | संस्थेतर्फे त्यांचे वकील ॲड.गौरव एल.देशपांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २९.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १३.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १६.०३.२०११ (फेरसादर दि.१६.०८.२०११) |

या प्रकरणाची सुनावणी आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. संस्थेचे वकील ॲड.गौरव देशपांडे उपस्थित आहेत.

संस्थेतर्फे त्यांच्या वकिलांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, ही संस्था खाजगी आहे. या संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान नाही. या संस्थेची नोंद मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये धर्मादाय आयुक्त यांच्याकडे झालेली आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज या संस्थेकडेच केला असल्याचे दिसून येत आहे. सदरची संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेली असल्यामुळे अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१३.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष मोतीलालजी पारिक, नावंदर गल्ली, लातूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, सचिव (मंत्री),राजस्थानी वि.प्र.मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नितीन सुभाष पारिक,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव (मंत्री),<br>राजस्थानी वि.प्र.मंडळ, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, राजस्थानी वि.प्र.मंडळ,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | संस्थेतर्फे त्यांचे वकील ॲड.गौरव एल.देशपांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०३.२०११<br>(फेरसादर दि.१६.०८.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. संस्थेचे वकील ॲड.गौरव देशपांडे उपस्थित आहेत.

संस्थेतर्फे त्यांच्या वकिलांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, ही संस्था खाजगी आहे. या संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान नाही. या संस्थेची नोंद मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये धर्मादाय आयुक्त यांच्याकडे झालेली आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज या संस्थेकडेच केला असल्याचे दिसून येत आहे. सदरची संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेली असल्यामुळे अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१३.०१.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन सुभाष पारिक, नावंदर गल्ली, लातूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, सचिव (मंत्री),राजस्थानी वि.प्र.मंडळ, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नसिर अहमदखॉन पिता मुस्तफाखॉन, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नोडल ऑफिसर,
मेरीट कम मिन्स स्कॉलरशिप तथा
डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन, मुंबई.

जन अपिलीय अधिकारी तथा :
नोडल ऑफिसर,
मेरीट कम मिन्स स्कॉलरशिप तथा
डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी-श्री.महेश द.शिवणकर, सहसंचालक,तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १९.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २९.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३.०८.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई यांचे दि.२२.११.२०११ रोजीचे निवेदन सादर केले. यामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाची आहे. सदर अर्जावरील कार्यवाही पूर्ण झाल्याने सदरचे सर्व अर्ज दप्तरी दाखल करण्यात आले होते. त्याच दरम्यान या कार्यालयामध्ये नवीन फर्निचर करण्याचे काम देखील सुरु होते. त्यामुळे सर्व कागदपत्रे शोधण्यास वेळ लागला. तसेच सदर कालावधीमध्ये या कार्यालयामार्फत राज्यस्तरीय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया चालू होती त्यामुळे सर्व अधिकारी,कर्मचारी वर्ग प्रवेशाच्या कामामध्ये व्यस्त होते. अल्पसंख्यांक कक्षासाठी कोणताही नियमित कर्मचारी वर्ग नेमण्यात आलेला नाही. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी,कर्मचाऱ्यांकडून अतिरिक्त कार्यभार देऊन अल्पसंख्यांक कक्षाचे काम पूर्ण करुन घेण्यात येते. त्यामुळे अर्जदाराला माहिती देण्यास थोडा विलंब झाला आहे. याबद्दल दिलगीर आहोत. भविष्यात याबाबत दक्षता घेण्यात येईल. अपिलार्थीस दि. ०१.१०.२०११ रोजीच्या पत्राद्वारे माहितीबाबत कळविण्यात आले आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,अपिलार्थीने दि. २९.०६.२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.यास्तव अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या

प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय घ्यावा, असे आयोगाचे मत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी अपिलार्थीच्या दि.२९.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नसिर अहमदखॉन पिता मुस्तफाखॉन,फैसल मंजिल, मकदूमपुरा,वांगी रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी, तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,३,महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७,मुंबई-४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,३,महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७,मुंबई-४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भास्कर नारायणराव लहाने,<br>रा.अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>दुय्यम निबंधक कार्यालय,<br>अहमदपूर,जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),<br>लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२००१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - दुय्यम निबंधक,अहमदपूर,<br>जि.लातूर- श्री. गणेश संभाजीराव कावळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सह जिल्हा निबंधक वर्ग-१<br>(नि.श्रे.),लातूर- श्री. एन. बी.विभुते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०५.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २८.०४.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००७ पासून ते अर्ज करण्याचा दिनांक या कालावधीतील नगर परिषद, अहमदपूर हद्दीतील मालमत्ताकर विभागातर्फे खरेदीखत करण्यात आलेल्या २०५१ दस्तऐवजासोबत जोडलेल्या ८-अ च्या तसेच ७/१२ उताऱ्याच्या प्रती मागितल्या आहेत. सदरची माहिती सन २००७ सालची असून त्यासाठी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण सत्याहत्तर सर्वेनंबर नमूद केलेले आहेत. या मधील ज्या स.नं.ची नोंदणी झालेली आहे, त्या दस्तऐवजाच्या सोबतच्या ८-अ व ७/१२ उताऱ्याच्या प्रती मागितलेल्या आहेत. अशाप्रकारच्या माहितीची एकूण २०५१ दस्तऐवजे झाली असून या माहितीच्या पृष्ठांची संख्या २२,२२५इतकी होईल.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या एखाद्या विभागाने जर त्यांच्याकडील दस्तऐवजाकरिता दर निश्चित केले असतील तर त्या दराने दस्तऐवजासाठी शुल्क भरणा करणे बंधनकारक असल्याकारणाने दि. १०.०५.२०११ रोजी अपिलार्थीस माहितीकरिता एकंदर प्रतिपृष्ठ ₹२०/- प्रमाणे ₹४,४४,५००/- शुल्क जमा करण्याकरिता कलम ७(१)नुसार विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी ७/१२ व ८-अ च्या सत्यप्रती मागितल्या आहेत. खरेदी-विक्री व्यवहाराच्या दस्तऐवजासोबत पुरवणी कागदपत्रे म्हणून या प्रती त्यांच्या कार्यालयात दाखल करण्यात येत असतात. अशा कागदपत्रांच्या वेगळ्या प्रती त्यांच्या कार्यालयात ठेवण्यात येत नाहीत. त्यामुळे त्या प्रती वेगळ्या देता येऊ शकत नाहीत.

जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),लातूर यांच्या कार्यालयात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीमध्ये असे स्पष्ट करुन सांगण्यात आले की, दस्तऐवजामधील छायाप्रती देता येऊ शकत नाही. तथापि आवश्यक असल्यास संपूर्ण दस्तऐवज विहित केलेले मुद्रांक शुल्काचा भरणा करुन प्राप्त करुन घ्यावे, असे नमूद करुन अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),लातूर यांनी या माहितीअर्जासंदर्भातील प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. ७/१२ व ८-अ या कागदपत्रांची निर्मिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात होत नसून खरेदी-विक्री व्यवहाराच्या नोंदणीकरिता दाखल करण्याच्या दस्तऐवजाचा एक भाग म्हणून ही कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात सादर होत असतात. ही कागदपत्रे म्हणजे ८-अ- ही कागदपत्रे संबंधित ग्रामपंचायत/नगरपरिषदेकडे व ७/१२ उतारा अशाप्रकारची कागदपत्रे संबंधित सजाच्या तलाठी कार्यालयात निर्माण होतात. त्यामुळे अपिलार्थी त्या कार्यालयाकडून स्वतंत्रपणे प्राप्त करुन घेऊ शकतात. आयोगास असेही दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण

२०५१ दस्तऐवजांबाबत माहिती मागितली आहे व या माहितीची पृष्ठसंख्या सुमारे २२००० इतकी होईल, अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर नारायणराव लहाने, भाग्यनगर, नांदेड रोड, अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप रंगनाथराव नलवाड,रा. लातूर. : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

जन अपिलीय अधिकारी, :
जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | ०२.०१.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२००९ (मुंबई कार्यालयाला प्राप्त)<br>दि. १०.०८.२०११ (पुणे कार्यालयाला प्राप्त)<br>दि. २५.०८.२०११ (औरंगाबाद कार्यालयाला प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात आवश्यक रकमेचा भरणा करावा, असे दि. १५.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच दि. ३१.१०.२००८ रोजीच्या समक्रमांकित शासनपत्रानुसार माहिती देऊन अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढल्याचे दिसून येत आहे. ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी दि. ०२.०१.२००९ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेली असून अपिलार्थीस त्यांच्या अपिलातील मुद्यांच्या अनुषंगाने जी माहिती उपलब्ध आहे, ती देण्यात आली आहे, असे कळविलेले आहे व अपील निकाली काढले आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नलवाड दिलीप रंगनाथराव, "शिवरंग"निवास, अमर हॉटेलच्या मागे, बार्शी रोड, मु.पो.ता.जि.लातूर - ४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (आस्थापना), जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. उषा राजाराम नटवे, : अपिलार्थी
रा. निलंगा, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
लातूर पाटबंधारे विभाग कार्यालय,लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लातूर पाटबंधारे विभाग,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०३.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.०३.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि. ०५.०३.२०११ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या एकूण १४ पृष्ठांसाठी टपालखर्चासह ₹६३/- इतक्या रकमेचा भरणा करण्यात यावा म्हणजे माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग, लातूर यांनी कळविले आहे व त्यानुसार शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. २३.०३.२०११ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. तथापि द्वितीय अपिलामध्ये त्यांना अर्धवट, दिशाभूल करणारी व त्रुटीयुक्त माहिती मिळाल्याचे मोघमपणे नमूद केल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रशासकीय बाबीशी संबंधित असल्याचे दिसून येत आहे.अपिलार्थीस प्रशासकीय बाबीकरिता त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे स्वतंत्र अर्ज करणे उचित होईल, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. उषा राजाराम नटवे, तेरणा प्रकल्प वसाहत, निलंगा, ता.निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लातूर पाटबंधारे विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद शफीख अहेमद पिता सय्यद मोहोमद : अपिलार्थी
पिता सय्यद मोहोमद,
रा.उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शालेय शिक्षण विभाग (मा.),
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

जन अपिलीय अधिकारी, :
शालेय शिक्षण विभाग (मा.),
महारा ष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०९.२०११ |

या प्रकरणाची आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. यासाठी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, शालेय शिक्षण विभाग (मा.), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, शालेय शिक्षण विभाग (मा.), मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दि.२५.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद शफीख अहेमद पिता सय्यद मोहोमद, रा.खडकाळी गल्ली, पैगंबरपुरा,

उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर - ४१३ ५१७.

२. जन माहिती अधिकारी, शालेय शिक्षण विभाग (मा.), मंत्रालय, मुंबई-३२यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, शालेय शिक्षण विभाग (मा.), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिगंबर त्र्यंबक देशपांडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहसचिव,
अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई- ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -सह सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई- ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त)<br>दि. १५.०९.२०११ (औ.बाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.यासाठी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई- ३२ यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई- ३२ यांनी अपिलार्थीच्या दि.२२.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिगंबर त्र्यंबक देशपांडे, प्लॉट नं. ४९,एन-६,आकाश हनुमान सह.गृ.नि.संस्था,

सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई- ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई- ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२

जन अपिलीय अधिकारी, :
नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०५.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०५.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे,२१,चैतन्य गुरुनगर,सिडको, एन-८,एफ-४,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सरवदे प्रफुल्ल गोरोबा, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

जन अपिलीय अधिकारी, :
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. यासाठी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव,कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव, कृषि, पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय,मुंबई यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरवदे प्रफुल्ल गोरोबा,द्वारा - श्री. बाबूलालजी पंडीत, "सरस्वती विहार",घर नं.२४४, जुनी पोलीस कॉलनी, रामनगर, म्हाडा कॉलनी, जालना-४३१ २०३.

२.	जन माहिती अधिकारी, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,कृषि, पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना (अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ए. ए. पंडीत,<br>रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक (विधी), विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| | - प्रतिनिधी - श्री. ए. शि. बुधवंत, उप सचिव | | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७-०२-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०८-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. ए. शि. बुधवंत, उप सचिव उपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थीस त्यांची बाजू ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येत आहे. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी. माहिती अर्जाच्या संबंधात जन माहिती अधिकारी यांची प्रमुख जबाबदारी आहे त्यामुळे त्यांनी स्वतः उपस्थित राहावे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ असतात त्यांच्या कार्यालयीन कामकाजाची त्यांना माहिती असल्याने त्यांनी मांडलेली बाजू सुध्दा महत्वाची ठरते, त्यामुळे त्यांनीही सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए. ए. पंडीत, रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (विधी), विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ए. ए. पंडीत,<br>रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ - प्रतिनिधी - श्री. ए. शि. बुधवंत, उप सचिव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २४-०२-२०११

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०६-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. ए. शि. बुधवंत, उप सचिव उपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येत आहे. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी. माहिती अर्जाच्या संबंधात जन माहिती अधिकारी यांची प्रमुख जबाबदारी आहे त्यामुळे त्यांनी स्वतः उपस्थित राहावे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ असतात त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना माहिती असल्याने त्यांनी मांडलेली बाजू सुध्दा महत्वाची ठरते, त्यामुळे त्यांनीही सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए. ए. पंडीत, रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कल्याण सोपानराव सोनवणे,<br>एन-११, के-४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ३२ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ३२ - श्री. शेळके मच्छिंद्र रंगनाथ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०६-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-१२-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. संजय बाबुराव खंडागळे यांच्या सेवाबाह्य कालावधीबाबतची विविध नऊ मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेल्या माहितीची संचिका उपलब्ध होत नाही, तिचा शोध घेणे चालू आहे असे दिनांक १७-०१-२०११ रोजी व त्याचप्रमाणे दिनांक १४-०३-२०११ रोजी कळविण्यात आले आहे. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली तथापि निर्णय निर्गमीत करण्यात आलेला नाही, असेही पुढे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

आयोगापुढे उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देण्यात आल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितलेली आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व ११ नुसार नैसर्गिक न्याय व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे योग्य ठरते किंवा कसे हि बाब तपासून माहिती देणेबाबत निर्णय घेणे योग्य ठरेल.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्री. सुधीर सोनटक्के यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ श्री. सुधीर सोनटक्के यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, एन-११, के-४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रसाद भालचंद्रराव वैद्य, : अपिलार्थी
हॉटेल मेघमल्हारच्या बाजूला, औसा रोड, रामनगर, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
जन अपिलीय अधिकारी, :
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | २६-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०९-२०१<br>(मुंबई कार्यालयाकडे प्राप्त )<br>दि. ०१-०७-२०११<br>(औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त ) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचे व्दितीय अपील मुख्य राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे दिनांक १६ सप्टेबर २०१० रोजी केलेले आहे. हे अपील राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २१-०६-२०११ च्या पत्रान्वये दिनांक ०१-०७-२०११ रोजी प्राप्त झाले आहे. अपिलार्थी यांनी दिनांक ०२ -६-२०१० च्या माहिती अर्जान्वये मराठवाडा विभागातील विकास कामाबाबतची माहिती मागितली आहे,तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचेही आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमत: सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रसाद भालचंद्रराव वैद्य, हॉटेल मेघमल्हारच्या बाजूला, औसा रोड, रामनगर, लातूर - ४१३ ५३१

२. जन माहिती अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवराज बाबाराव धोंडे,<br>मु. पो. शेवडी बा., तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक संचालक (प्रशासन), समाकल्याण संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे | : | उत्तरवादी |
| २ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ३२ | | |
| ३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक संचालक (प्रशासन), समाकल्याण संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७-०३-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०-०६-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०७-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. अनिल शेंदारकर यांच्या नांदेड येथील कार्यकालाबद्दल व त्यांची इतरत्र बदली न करण्याच्या कारणाबद्दल माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (प्रशासन), समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १७-०३-२०११ रोजी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ ची माहिती दिली आहे व मुद्दा क्रमांक २ च्या माहितीकरिता अपिलार्थीचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे वर्ग केला आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०३-२०११ रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांनी मुद्‌दा क्रमांक २ मध्ये मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने देणे अपेक्षित नाही, तथापि मुद्दा क्रमांक २ मध्ये अपिलार्थीने विचारलेल्या कर्मचा-यांची बदली करण्याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवराज बाबाराव धोंडे, मु. पो. शेवडी बा., तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (प्रशासन), समाकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पाशा बेग पिता गुलाम बेग, | : | अपिलार्थी |
| व्दारा, अख्तर बेग गमीर बेग, देवळा उद्यानाजवळ, अबरार कॉलनी, बीड बायपास, औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०६-२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | २१-०९-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७-०१-२०११ (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त)<br>दि. १२-०७-२०११ (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी प्रथम अपील निर्णयानंतर १०६ दिवस विलंबाने व्दितीय अपील सादर केले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) च्या परंतुकानुसार सादर केलेले नाही. तथापि हा विलंब क्षमापित करुन सदर अपील आज रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते. आज रोजी कोणीही उपस्थित नाही. अपिलार्थी यांचे व्दितीय अपील परीपूर्ण नव्हते, पुर्तता करुन फेरसादर केले आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांनी निर्णय दिला आहे की, विभागात उपलब्ध असलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी यापुर्वीच अपिलार्थीस पुरविली असल्यकारणाने अपील निकाली काढले आहे. प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. या सर्व बाबी विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यक वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-११-२०११**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाशा बेग पिता गुलाम बेग, व्दारा, अख्तर बेग गमीर बेग, देवळा उद्यानाजवळ, अबरार कॉलनी, बीड बायपास, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, : अपिलार्थी
श्री. मोठा मारोती मंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
जन अपिलीय अधिकारी, :
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, श्री. मोठा मारोती मंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी.

२. जन माहिती अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेश बन्सीलाल शहा,<br>प्लॉट नं. ३-१४-२५, सी. टी. एस. नं. ८१२०, बन्सी कुंज,<br>पानदरीबा रोड, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,<br>मुंबई - ३२ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,<br>मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४-०६-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेश बन्सीलाल शहा, प्लॉट नं. ३-१४-२५, सी. टी. एस. नं. ८१२०, बन्सी कुंज,

पानदरीबा रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अजित मुरलीधरराव देशमुख, : अपिलार्थी
गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक आरोग्य विभाग, (सेवा-३), मंत्रालय,
मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी, :
सार्वजनिक आरोग्य विभाग, (सेवा-३), मंत्रालय,
मुंबई - ३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, (सेवा-३), मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, (सेवा-३), मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०१-२००७ (वर्ष २००८ आहे) |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २५-०१-२००८

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०४-२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.तसेच अपिलार्थि यांनीही त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीची नोटीस उशीरा मिळाल्याने ते सुनावणीस उपस्थित राहू शकले नसल्याबाबत नमूद केले आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थिस प्रथम अपिल सुनावणीची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र भागाजी खरात, मु.पो.करमाड, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सा.प्र.),जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिपक देविदास गवई, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, बुलडाणा

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),
जिल्हा परिषद, बुलडाणा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिपक देविदास गवई | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० (अमरावती कार्यालयास प्राप्त)<br>दि. ०५.१०.२०१० |

(औ.बाद कार्यालयास प्राप्त)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी स्वतःच्या शासकीय सेवेच्या संदर्भात अकरा मुद्यांवर मागितली आहे. त्यापैकी त्यांना एक मुद्यासंदर्भात माहिती मिळाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी निर्णय दिला तथापि त्यांना अद्यापही माहिती मिळाली नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही, असे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी, यासाठी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर पुन्हा एकदा सुनावणी घ्यावी व अपिलार्थीस देय होणारी माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस देतील असे पहावे व यथोचित निर्णय घ्यावा या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिपक देविदास गवई, द्वारा श्री. ए.ए.नरवाडे, पोस्टमन, हेड पोस्ट ऑफीस,

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोणार,

जि.बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद, बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सलीमोद्दीन अलाऊद्दीन, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी नायब तहसीलदार (महसूल-१),
तहसील कार्यालय,गंगापूर, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. डी.के.जाधव, लिपीक,तहसील कार्यालय,गंगापूर यांनी केलेल्या कामाबाबत विशिष्ट तक्ता तयार करुन त्यांनी दि. ०१.०१.२००८ ते ३१.१२.२००९ या कालावधीत कोणकोणती कामे केली याबाबत माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती देणे अभिप्रेत आहे. तक्त्यामध्ये माहिती तयार करुन माहिती देणे अधिनियमातील कलम २(च) मधील स्पष्ट केलेल्या 'माहिती' या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थी यांनी त्यांना हवी असलेली, नेमक्या माहितीच्या कागदपत्रांची मागणी स्वतंत्रपणे करावी, असे आयोगाचे मत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाच्या स्तरावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सलीमोद्दीन अल्लाउद्दीन,प्लॉट नं.१, एस.टी.कॉलनी, कटकटगेट,औरंगाबाद-४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार (महसूल-१),तहसील कार्यालय,गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. केशव सावळराम एकमोडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस निरीक्षक,
त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन, जि.नाशिक

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण, नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे यांनी त्यांच्या दि. ३१.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस त्यावेळेची सद्यस्थिती कळविली आहे, असे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. केशव सावळाराम एकमोडे,"जानकी", प्लॉट नं.१८५,एन-३,सिडको, औरंगाबाद-४३१००३

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मच्छिंद्रनाथ रंगनाथ जाधव,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त,<br>मुख्यालय/परिमंडळ,पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद - श्री. के.एस.बहुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपआयुक्त(मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१८.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मच्छिंद्रनाथ रंगनाथ जाधव, सरफराज कॉम्प्लेक्सच्या बाजूला, जाधव निवास, फाजलपूरा,एस.टी. कॉलनी, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. यासेर एक्बाल वहाबुद्दीन हाशमी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
नगर रचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक,
नगर रचना विभाग,महानगरपालिका,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता,<br>नगर रचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक,<br>नगर रचना विभाग,महानगरपालिका,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिति व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यासेर एक्बाल वहाबुद्दीन हाशमी, घर नं. ३-१२-५९, ताज कॉम्प्लेक्स, राजाबाजार, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना विभाग, महानगरपालिका,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुजीत विनायक शेलार, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
स्थावर विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
स्थावर विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी दि. २३.०६.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने स.नं.४१, भाऊसिंगपुरा, नंदनवन कॉलनी, आशानगरच्या पूर्वेस असलेली चिकू, अशोका व इतर झाडे तोडल्याबाबत एका मुद्यावर माहिती मागितली आहे. या माहितीसंदर्भात दि. १३.०७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी,स्थावर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०८.२०१० रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती वस्तुस्थितीनुसार आहे, असा निर्णय घेतलेला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपील प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुजीत विनायक शेलार, प्लॉट नं.१५, आशानगर,नंदनवन कॉलनी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, स्थावर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,स्थावर विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी बाबुराव गाडेकर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता-ड,
महानगरपालिका,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त शहर अभियंता (अ व ड),
महानगरपालिका,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी महानगरपालिका हद्दीमध्ये पुतळा बसविण्याकरिता प्रश्नार्थक स्वरुपामध्ये माहिती मागितली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०८.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे ती माहितीच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे देता येणे शक्य नाही. तथापि माहितीची पाहणी करुन व आवश्यक वाटल्यास शुल्क भरल्यानंतर कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात येतील, असेही नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता (अ व ड), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी ठेवली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्यामुळे अपील प्रकरण निकाली काढले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण नस्तीची पाहणी देऊ केली आहे.

या बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या माहितीसंदर्भातील नस्तीची पाहणी करण्यासाठी पुन्हा एकदा संधी द्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी बाबुराव गाडेकर, सरचिटणीस, महाराष्ट्र ओ.बी.सी.जनजागरण समिती, सावता महाराज मंदिर, औरंगपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता-ड,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता (अ व ड), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहम्मद इक्रामुल्ला वल्द मोहम्मद अब्दुल कय्युम, रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहम्मद इक्रामुल्ला | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद - श्री. अभय अनंतराव जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सन १९७८-७९ सालची आहे. संबंधित नस्तीचा शोध घेऊनही जन माहिती अधिकारी यांना ही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. तथापि त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती त्या कागदपत्रांची पाहणी अपिलार्थीस देण्यात आली आहे.अपिलार्थी यांनी संचिकेची पाहणी केली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रांची पाहणी केली आहे. तथापि त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती मिळाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थी ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे इतरत्र अन्य कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील किंवा कसे, हे पाहणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. ही बाब उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांनी पहावी व संबंधित कागदपत्रांचा शोध घ्यावा. यासाठी दोन कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करावे व या शोधाचा निर्णय अपिलार्थीस या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात कळविण्यात यावा. ही कार्यवाही दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद इक्रामुल्ला वल्द मोहम्मद अब्दुल कय्युम,ब्लॉक नं.७३, म्हाडा कॉलनी,

रोशनगेट, चम्पा चौक मस्जीद, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भगवान विठ्ठल कांबळे,<br>मु. पो. आरळी (खुर्द), तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १२-०८-२००९ च्या माहिती अर्जान्वये मौजे आरळी (खुर्द), तालुका तुळजापूर येथील ग्रामसेवक, सरपंच, पाणीपुवठा समिती कडून झालेल्या गैरव्यवहाराबाबत सन १९८६-८७ या कालावधीतील चौकशी संदर्भातील चौकशी अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला आहे. सदरची माहिती दिनांक ०१-०१-२०१० च्या पत्रान्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे. तथापि बाराव्या वित्त आयोगाअंतर्गत ग्रामपंचायतीने केलेल्या प्रत्येक कामाची सर्व प्रमाणपत्रे त्याचप्रमाणे आरळी (खुर्द) येथील रस्ते मजबुतीकरण इत्यादी कामाची अंदाजपत्रकीय किंमत, मोजमाप पुस्तिका, मुल्यांकन प्रमाणपत्र इत्यादी देण्यात आल्याचे दिसून येत नाही. ही माहिती अपिलार्थीस यापूर्वी दिली नसल्यास ती नोंदणीकृत टपालाने देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत माहिती अपिलार्थीस यापूर्वी दिली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भगवान विठ्ठल कांबळे, मु. पो. आरळी (खुर्द), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निवृत्ती सोपान भोजने (माळी), : अपिलार्थी
रा. काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन तसेच अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २४-१०-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळाली नसल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे दिनांक २४-११-२००९ अन्वये प्रथम अपील सादर केले आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती सोपान भोजने (माळी), रा. काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिंदे गहिनीनाथ गोविंद,<br>रा. पांगरदरवाडी, पो. सांगवी (काटी), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पांगरदरवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पांगरदरवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन तसेच अपिलार्थीच्या दिनांक १८-०२-२०१० च्या व्दितीय अपिलावरुन अपिलार्थीस चुकीची व अपूर्ण माहिती मिळाली आहे. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक २२-१२-२००९ अन्वये प्रथम अपील सादर केले आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंदे गहिनीनाथ गोविंद, रा. पांगरदरवाडी, पो. सांगवी (काटी), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पांगरदरवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती कलावती बालाजी कासदेकर,<br>अधिपरिचारिका, ग्रामीण रुग्णालय, भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>ग्रामीण रुग्णालय, भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>ग्रामीण रुग्णालय, भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १८-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये ग्रामीण रुग्णालय, भूम येथील अधिपरिचारिका या पदाच्या सेवाविषयक काही माहिती तसेच त्रयस्थ अधिपरिचारिका यांची दोन मुद्याबाबत माहिती मागितली आहे. या अर्जाच्या संदर्भात दिनांक १४-०१-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, भूम यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, भूम यांनी सुनावणी घेऊन दिनांक ११-०२-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती विहित मुदतीत अपिलार्थीस देण्यात आली असल्याने प्रथम अपील निकाली काढले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे असे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती कलावती बालाजी कासदेकर, अधिपरिचारिका, ग्रामीण रुग्णालय, भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळासाहेब कल्याण धनके, | : | अपिलार्थी |
| मु. पो. सिंदफळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९-०१-२०१० (पुणे खंडपीठाकडे प्राप्त)<br>दि. २२-०२-२०१० (औरंगाबाद खंडपीठाकडे प्राप्त ) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. आयोगाने याची गंभीर नोंद घेतली आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये मौजे सासुरे, तालुका बार्शी हद्दीतील गट नंबर ५८५ अ व ब संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली आहे.

१. मौजे सासुरे, तालुका बार्शी येथील गट नं. ५८५ अ वर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन), सोलापूर ही नोंद कोणत्या नियमाच्या, आदेशाच्या पत्राच्या आधारे कमी करण्यात आली त्या नियमावलीच्या आदेशाची सत्यप्रत.

२. मौजे सासुरे, तालुका बार्शी येथील गट नंबर ५८५ अ वर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन), सोलापूर ही नोंद ५८५ ब वरती कोणत्या आदेशान्वये (पत्रान्वये) घेण्यात आली त्या आदेशाच्या (पत्राची) सत्यप्रत मिळणे.

३. वरील (१) व (२) मुद्दयाच्या छायांकीत सत्यप्रती मिळणेबाबत.

सदरची माहिती देण्याकरिता काही कालावधी लागेल असे दिनांक २७-१०-२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक २८-१०-२००९ रोजी तहसीलदार, बार्शी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना तीन महिने १५ दिवस उशिराने माहिती मिळाली आहे तसेच अर्जानुसार माहिती मिळाली नसून दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व त्यांना देण्यात आलेली माहिती यांची पाहणी करुन दिलेली माहिती योग्य आहे किंवा कसे या निष्कर्षाप्रत येण्याकरिता जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी पहाणी करावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीस माहिती पुरविण्यास उशीर झाला असल्याकारणाने याबाबतचा खुलासा संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी यांच्याकडून मागवावा व विलंबाची कारणे संयुक्तीक आढळून न आल्यास योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब कल्याण धनके, मु. पो. सिंदफळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लक्ष्मण बळवंतराव देशमुख, | : | अपिलार्थी |
| | 'जुनी हवेली' वाशी, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लाखनगांव,<br>तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लाखनगांव,<br>तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यात येत आहे. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण बळवंतराव देशमुख, 'जुनी हवेली' वाशी, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लाखनगांव, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पांडुरंग नरसू कानडे,<br>मु. पो. वरुडा, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१. मौजे वरुडा तालुका उस्मानाबाद येथील गावठाणातील जागेचा दिलेला कबाला.

२. प्लॉटचा नकाशा.

३. ताबा पावती.

४. वाटप प्रमाणपत्र.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२०१० रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती द्यावी असा निर्णय दिलेला आहे. अपिलार्थी यांच्या दिनांक १७-१२-२००९ च्या प्रथम अपिलावर त्यांना माहिती मिळाली नाही असे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनाविलंब माहिती देण्याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणा-या माहितीच्या अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कारवाई करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दक्ष राहावे अशी जन माहिती अधिकारी अधिका-यास समज देण्याची व्यवस्था तहसीलदार, उस्मानाबाद यांना करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणा-या माहितीच्या अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कारवाई करण्याबाबत दक्ष राहावे याकरिता जन माहिती अधिकारी अधिका-यास समज देण्याची व्यवस्था तहसीलदार, उस्मानाबाद यांनी करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-११-२०११**

----------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग नरसू कानडे, मु. पो. वरुडा, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण गोरोबा पवार, : अपिलार्थी
मु. पो. जवळा (खुर्द), तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळा खुर्द,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळा खुर्द,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सर्व शिक्षण अभियानाअंतर्गत जवळा (खुर्द) येथील बांधकामाबाबत माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्याच प्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-११-२०११**

-----------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण गोरोबा पवार, मु. पो. जवळा (खुर्द), तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळा खुर्द, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुर्यवंशी चंद्रकांत अर्जुनराव, : अपिलार्थी
छत्रपती शिवाजी हायस्कूल जवळ, तांबरी विभाग,
उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १५-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये तीन मुद्दयावर त्रयस्थ यांच्या सिटी सर्व्हे नंबर ३९६८ मधील मिरची कांडणालय व पिठाच्या गिरणीची माहिती मागितली आहे. सदर माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस दिनांक १५-०१-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक, नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी प्रतिसाद देऊन माहिती कळविल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे मोघमपणे नमूद करुन अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०२-२०१० रोजी प्रथम अपील केले असून आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-११-२०११**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी चंद्रकांत अर्जुनराव, छत्रपती शिवाजी हायस्कूल जवळ, तांबरी विभाग, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

अपिल क्रमांक १२२८/२०१० सुनावणी दिनांक २९.११.२०११,
अपिलार्थी श्री. सुर्यवंशी चंद्रकांत अर्जुनराव,रा.उस्मानाबाद
विरुध्द मुख्याधिकारी,नगर परिषद,उस्मानाबाद
या निर्णयाबाबत

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद
शुध्दीपत्रकः- क्रमांक २०१२ /रामाआ/अपील/सीआर-१२२८/२०१०/३८९०
दिनांक : ३१ /५/२०१२

वाचाः- १) क्रमांक २०१२/अपील/सीआर-१२२८/२०१०
दिनांक : २९/११/२०११

**शुध्दीपत्रकः-**

वरील संदर्भाधीन क्रमांक १ येथील मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांच्या पुढील सुनावणी झालेल्या अपील क्रमांक १२२८/२०१०, सुनावणी दिनांक २९.११.२०११ या निर्णयातील अनुच्छेद क्रमांक ३.३ व आदेश तसेच प्रत अनुक्रमांक ३ येथील "जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,कंळब, जिल्हा उस्मानाबाद" **या ऐवजी** "जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,उस्मानाबाद असे वाचावे.

(मा.राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद यांच्या मान्यतेने)

उपसचिव

राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१) श्री. सुर्यवंशी चंद्रकांत अर्जुनराव,छत्रपती शिवाजी हायस्कूल जवळ ,तांबारी विभाग,उस्मानाबाद

२) जन माहिती अधिकारी , नगर परिषद, उस्मानाबाद

३) जन अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद

४) गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,कंळब,जिल्हा उस्मानाबाद

५) निवडनस्ती

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. निवृत्ती सोपान भोजने, (माळी),<br>मु. पो. काटी, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०८-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये मौजे काटी, तालुका तुळजापूर येथील गावठाण जागेचे ९० भाडेकरु, त्यांचे करार इत्यादीची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येते. तथापि त्यांना खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे असे मोघमपणे नमूद केले आहे. नेमके कोणती चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे हे नमूद केले नाही. अपिलार्थीच्या दिनांक १२-०१-०१० प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. याकरिता प्रकरण सुनावणीसाठी त्यांच्याकडे परत करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निवृत्ती सोपान भोजने, (माळी), मु. पो. काटी, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दादासाहेब दुष्यंत बनसोडे, : अपिलार्थी
रा. भिमनगर, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदगण,
सलगरा (म), होर्टी, गंधोरा, येडोळा, कसई,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३०

२ सुनावणीची तारीख दि. २९-११-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदगण,
सलगरा (म), होर्टी, गंधोरा, येडोळा, कसई,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०२-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १०-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये संपूर्ण ग्रारोहयो, दलित वस्ती सुधार, तांडा वस्ती सुधार, ग्रा. पाणी पुरवठा, यशवंत ग्रा. समृध्दी, बारावा वित्त आयोग अंतर्गत मौजे शिंदगाव, सलगरा (मडजे), होर्टी, गंधोरा, येडोळा, कसई या गावांची संपूर्ण ग्रामीण रोहयो अंतर्गत झालेल्या कामाचे मजुराचे मस्टर, धान्य वाटप कुपन, कुपन क्रमांक लेखापरिक्षण अहवाल, मंजूर कामाची यादी, मंजूर निधी, शिल्लक राहिलेला निधी, योजनेअंतर्गत सुरु केलेली कामे, त्यावर झालेला खर्च, उचललेली रक्कम, कोणत्या खर्चासाठी, कोणत्या निधीतून, किती रक्कम उचलली किती शिल्लक राहिली, दलित वस्ती सुधार योजना, तांडा वस्ती सुधार, ग्रामीण पाणीपुरवठा, यशवंत ग्रा. समृध्दी व १२ वा वित्त आयोग अंतर्गत कामाचे, इस्टिमेट, तांत्रिक मंजुरी, प्रशासकीय मंजुरी, लोकेशन, अंदाजपत्रक, निविदा काराारनामा, एकूण मंजूर रक्कम, पूर्ण झालेल्या कामाची एम. बी. ची सत्यप्रत इत्यादि, अशी विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी ०१ जानेवारी २००५ ते दिनांक २५-११-२००९ असा पाच वर्षाचा आहे.

अपिलार्थीचा माहितीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने विस्तृत स्वरुपाची व मोठ्या कालावधीची माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे तसेच माहिती अधिकार अधिनियम मधील कलम ७ (९) नुसार अशा माहितीचा अर्ज रद्द ठरविता येतो. केंद्रीय माहिती आयोगाने अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहेत.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदगण, सलगरा (म), होर्टी, गंधोरा, येडोळा, कसई, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती सात दिवसाच्या आत द्यावी असा निर्णय घेतला. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती, कालावधी विचारात घेता अपिलार्थीस सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांना नेमकी ज्या कामाची माहिती आवश्यक आहे त्या कामाबाबत संबधित जन माहिती

अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावे व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास त्याबाबतच्या संपूर्ण माहितीच्या प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दादासाहेब दुष्यंत बनसोडे, रा. भिमनगर, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदगण, सलगरा (म), होर्टी, गंधोरा, येडोळा, कसई, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महेंद्र रामचंद्र बिदरकर, : अपिलार्थी
श्रीराम निवास, काकडे प्लॉट, एम. एस. ई. बी. गॅस
गोडाऊनच्या पाठीमागे, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,<br>उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये स्वस्त धान्य दुकान क्रमांक १ या दुकानाची अन्नपूर्णा व अंत्योदय या योजनेचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांची सविस्तर यादी तसेच जानेवारी २००६ ते नोव्हेबर २००९ पर्यंत उचललेल्या मालाच्या तपशीलासह पावत्या इत्यादीची माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी जानेवारी २००६ ते नोव्हेबर २००९ असा आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दिनांक ०५-०१-२०१० अन्वये तहसीलदार, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांनी त्यावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे. अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन अपिलार्थीस अद्याप माहिती मिळाली नाही असे दिसून येत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत, त्यामुळे सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या या प्रकरणात अपिलार्थीस माहिती मिळाली आहे किंवा कसे व माहिती मिळाली नसल्यास त्या विलंबाची कारणे काय आहेत याची संपूर्ण चौकशी करण्याची शिफारस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे, तसेच चौकशीअंती अपिलार्थीस माहिती देण्यास कारणाशिवाय विलंब झाला आहे असे आढळून आल्यास त्यांना संबंधिताविरुध्द प्रशासकीय कारवाई योजावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रकरणात चौकशी करुन चौकशीअंती अपिलार्थीस माहिती देण्यास कारणाशिवाय विलंब झाला आहे असे आढळून आल्यास संबंधिताविरुध्द प्रशासकीय कारवाई योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महेंद्र रामचंद्र बिदरकर, श्रीराम निवास काकडे प्लॉट, एम. एस. ई. बी. गॅस गोडाऊनच्या पाठीमागे, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाही-साठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, : अपिलार्थी
मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सामाजिक वनीकरण कार्यालय, दयानंद नगर, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय,
तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>सामाजिक वनीकरण कार्यालय, दयानंद नगर, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय,<br>तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १२-१०-२००९ च्या माहिती अर्जान्वये तुळजापूर ते नळदुर्ग रस्ता ०६ ते ०८ कि. मी. या कामाबाबत आठ मुद्द्यावर माहिती मागितली आहे. त्यामध्ये मोजमाप पुस्तिका, त्या कामावर अधिका-यांनी भेटी दिलेले टिपण डायरी, मजुराचे हजेरी मस्टर इत्यादीचा समावेश आहे.

आज रोजी कोणीही उपस्थित नसल्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकली नाही. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा

उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, सामाजिक वनीकरण कार्यालय, दयानंद नगर, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अंबादास बाळासाहेब व-हाडे, : अपिलार्थी
रा. वेताळ नगर, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धामनगांव (बोध),
तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी,
जिल्हा सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धामनगांव (बोध),<br>तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी,<br>जिल्हा सोलापूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०३-२००९ (पुणे खंडपीठास प्राप्त)<br>दि. २३-०३-२०१० (औरंगाबाद खंडपीठास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत, याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२००८ च्या माहिती अर्जान्वये धामणगाव ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या विकासात्मक कामासबंधी, यशवंत ग्रामसमृध्दी योजना, बारावा वित्त आयोग, जवाहर योजना, दलित वस्तीत सर्व झालेली कामे इत्यादीची एकूण १८ मुददयावर माहिती मागितली आहे. त्यामध्ये कामाचे अंदाजपत्रक, एम. बी., सीसी कुपन्स, टेस्ट रिपोर्ट अशी व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी २००० ते २००८ असा नऊ वर्षाचा आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-११-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंबादास बाळासाहेब व-हाडे, रा. वेताळ नगर, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धामनगांव (बोध), तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, जिल्हा सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बसवराज लिंगप्पा जमादार,<br>मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, काटी, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, काटी, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. आयोग याची गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुर्यकांत भुजंगराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. पोहनेर, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण उपविभाग, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ओ अँण्ड एम डिव्हिजन ऑफिस, ताजमहल टॉकीजजवळ, सोलापूर रोड, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण उपविभाग, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ओ अँण्ड एम डिव्हिजन ऑफिस, ताजमहल टॉकीजजवळ, सोलापूर रोड, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ११-०२-२०१० प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद यांनी सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. तसेच विलंबाबाबत त्यांनी चौकशी करुन अपिलार्थीस अद्याप माहिती दिली नसल्यास संबंधिताविरुध्द आवश्यक ती कार्यवाही करावी.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यकांत भुजंगराव देशमुख, मु. पो. पोहनेर, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ओ अँण्ड एम डिव्हिजन ऑफिस, ताजमहल टॉकीजजवळ, सोलापूर रोड, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भारत छोटूलाल चव्हाण, : अपिलार्थी
कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग,
उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिष्द, बांधकाम विभाग,
उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग,<br>उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जिल्हा परिष्द, बांधकाम विभाग,<br>उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी दिनांक ०८-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीची दिनांक ११-०१-२०१० रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून पाहणी करावी असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बां.), जिल्हा परिषद उपविभाग, उस्मानाबाद यांनी दिनांक ०७-०१-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस खास दुतामार्फत विहित मुदतीत कलम ७ (१) नुसार कळविल्याचे दिसून येत आहे व त्यामध्ये पाहणीसाठी आवश्यक असलेल्या शुल्काचा तपशील दिला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिष्द, बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी दिनांक १७-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस कार्यालयात उपलब्ध कागदपत्रे पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केलेली कारवाई मुदतीत आहे. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २९-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भारत छोटूलाल चव्हाण, कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भास्कर दगडू जाधवर,<br>सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-०२-२००९ च्या माहिती अर्जान्वये सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना त्यांच्या स्वत:बाबतची माहिती मागितली आहे. सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जावर दिनांक ०५-०३-२००९ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १७-०८-२००९ च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक २००६ मधील रक्कम रुपये १२,६२८ व्याजासह त्यांना देण्यात आली नाही याबाबतची माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे. याबाबतची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी, कार्यालय सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस कळवावी असे निदेश आयोगातर्फे देण्यात येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी, कार्यालय सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने कळवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर दगडू जाधवर, सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण क्षीरसागर, : अपिलार्थी
मराठवाडा टॅक्सी संघटक, कार्यालय, ढोकी रोड, कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २८-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०३-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २८-०१-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०३-११-२००८ च्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २९-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण क्षीरसागर, मराठवाडा टॅक्सी संघटक, कार्यालय, ढोकी रोड, कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुंदरराव भाऊराव पाटील,<br>मु. आलेश्वर, पो. डोंजा व्हाया सोनारी, तालुका परंडा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २९-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०४-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०४-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००८<br>फेरसादर दिनांक<br>०५-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मौजे आलेश्वर, तालुका परंडा या गावाच्या शिवारातील सरकारी रस्त्याच्या पाणंदी व्यवस्थेची विविध मुद्दयावर माहिती मागितली आहे. बहुतांश माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात आहे त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये येत नसल्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थी यांनी पाणंदीच्या शिवारातील रस्त्यावर झालेले अतिक्रमण, शेतक-याची नावे, त्यावर आकारला जाणारा तावान दंड, तावानची किमान ५० वर्षात होणारी एकूण रक्कम, आतापर्यंत झालेली वसुली इत्यादी माहिती उर्वरीत मुद्दयाव्दारे मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०४-२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे असे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, भूम यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०८-०५-२००८ रोजी सुनावणी घेतली आहे. त्यामध्ये तहसीलदार, परंडा यांनी मौजे आलेश्वर या गावाच्या अभिलेख्याच्या प्रती आठ दिवसाच्या आत अपिलार्थीस पुरवाव्या असा निर्णय दिला आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००८ च्या व्दितीय अपिलावरुन अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार माहिती मिळाली नाही असे अपिलामध्ये नमूद केले आहे. यास्तव यापूर्वी अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती यापूर्वी दिली नसल्यास ती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २९-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुंदरराव भाऊराव पाटील, मु. आलेश्वर, पो. डोंजा व्हाया सोनारी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. खदीर म. खाजा शेख, : अपिलार्थी

रा. अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४७

२ सुनावणीची तारीख दि. ३०-११-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. खदीर म. खाजा शेख : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

अव्वल कारकून (म.), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड - श्री. देसाई जी. एन.

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड - श्री. संतोष वेणीकर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०९-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ३०-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालील चार मुद्दयावर माहिती मागितली आहे.

१. मेंढला खुर्द येथील स्वस्त धान्य दुकान कोणाच्या आदेशाने पुरवठा बंद केला त्या आदेशाचे झेरॉक्स प्रती मिळणेबाबत.

२. मेंढला खुर्द येथील स्वस्त धान्य दुकान कोणाच्या आदेशाने पर्यायी व्यवस्थेत जोडले आहे त्याच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत.

३. स्वस्त धान्य दुकान मेंढला खुर्द ला दुकानावर केलेल्या कार्यवाहीच्या सर्व तपशीलच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत.

४. स्वस्त धान्य दुकान मेंढला खुर्द केव्हापासून पर्यायी व्यवस्थेत जोडले आहे त्या आदेशाची झेरॉक्स प्रती मिळणेबाबत.

ही माहिती त्यांना अद्यापर्यंत मिळालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मेंढला खुर्द येथील रेशन दुकानाबाबत चार मुद्दयावर मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. प्रसंगावशात मेंढला खुर्द या गावामध्ये रेशन कार्डाचे धान्य वाटप होत नाही. मेंढला खुर्द या गावातील ११ अंत्योदय कार्डाला मेंढला बु. येथील त्रयस्थ श्री. कसबे विठ्ठल यांच्या दुकानाला जोडले होते. ही ११ अंत्योदय कार्ड जन अपिलीय अधिकारी यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच जोडलेली होती. अपिलार्थी यांना या स्वस्त धान्य दुकानाची माहिती अपेक्षित होती. त्या दुकानाला यापूर्वी स्वस्त धान्य वितरणासाठी दिले नाही तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, नांदेडकडून लायसन्स दिलेले नाही आणि त्यांच्या कार्यालयात याची प्रत उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही बाब लेखी कळवावी लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही

अवगत केले की, अपिलार्थीचे नेहमी अर्ज येत असतात व त्यांना माहिती देण्यास त्यांचे कार्यालय प्रयत्नशील असते.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने कळवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खदीर म. खाजा शेख, रा. अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (म.), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राऊतराव रामराव लालुजी, : अपिलार्थी
४३, 'पितृछाया', लालबहादुर शास्त्री नगर, भाग्यनगर जवळ, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप प्राचार्य, पिपल्स कॉलेज, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, पिपल्स कॉलेज, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप प्राचार्य, पिपल्स कॉलेज, नांदेड - डॉ. एच. आर. भेलोंडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, पिपल्स कॉलेज, नांदेड - डॉ. व्ही. एन. इंगोले | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०१-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०३-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

२) आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या संदर्भात यापूर्वी राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठापुढे दिनांक २३-०९-२००९ रोजी सुनावणी झाली आहे. त्यावेळी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे वकील उपस्थित होते. त्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जर त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली असती तर त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबाबत चर्चा करण्याची संधी मिळाली असती व माहिती अपूर्ण प्राप्त होऊ शकली नसती. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही. आयोगाच्या दिनांक २३-०९-२००९ च्या निर्णयामध्ये या बाबी नमूद आहे. अपिलार्थीस प्रथमत: जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध माहिती दिनांक ०८-०२-२००८ व तदनंतर दिनांक ०१-०४-२००८ च्या पत्राव्दारे दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२००८ च्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा असे आयोगाने त्यावेळी निर्देश दिले आहेत व अपील निकाली काढले आहे.

३) आज रोजी आयोगापुढील सुनावणीत अवगत करण्यात आले की, या आदेशानुसार जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पिपल्स कॉलेज, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली आहे व याबाबतचा निर्णय दिनांक २७-१०-२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आला आहे. या प्रथम अपिलाच्या सुनावणीअंती प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर आहे. त्याच-बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या दिनांक २६-१०-२००९ च्या सुनावणीच्या वेळी नव्याने उपस्थित केलेल्या मुद्दयावरही माहिती दिलेली आहे. या सर्व बाबी उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास दिसून येत आहेत.

४) आज रोजी नांदेड येथे सुनावणी लावलेली आहे अत: अपिलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित राहणे अपेक्षित आहे. तथापि अपिलार्थी अनुपस्थित आहेत. किंवा अपिलार्थी यांनी त्यांच्या अनुपस्थितीसाठी राज्य माहिती आयोगास पूर्वसूचनाही दिलेली दिसून येत नाही. अपिलार्थीतर्फे त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १८-०१-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये पुन्हा अपूर्ण, विसंगत व दिशाभूल करणारी माहिती त्यांना देण्यात आली आहे असे मोघमपणे नमूद केले आहे, नेमके नमूद केले नाही. त्याचप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीच्या विषयामध्ये अ, ब, क व ड हे जे चार विषय नमूद केले आहेत त्यातील अ व ब ची माहिती यापूर्वीच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे आढळून येत आहे. क व ड येथील माहिती कागदपत्रे चौकशी प्रक्रिया अंतर्गत पोलीस विभागाच्या कस्टडीत असल्यकारणाने सदरची माहिती संबंधितास दुस-या टप्प्यात देण्यात आली होती व सदरची माहिती दुस-या टप्प्यात इतर त्रयस्थ अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील भूमिकेचे महत्त्व, विचारात घेऊन प्राप्त करुन अपिलार्थीस दिलेली आहे, असे सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत करण्यात आले आहे.

५) आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असेही दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दोन वेळा त्यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी करण्यास कागदपत्रे उपलब्ध करुन दिली होती. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी पाहणी केली आहे. तसेच प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी नव्याने उपस्थित केलेल्या एकूण बारा मुद्दयावरही माहिती पुरविली आहे. प्रथम अपील तसेच व्दितीय अपिलामध्ये नव्याने मुद्दे उपस्थित करणे अभिप्रेत नाही तरीही माहिती देण्यास सकारात्मक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये मुद्दा क्रमांक ३ व ४ मध्ये माहिती तक्त्यामध्ये मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येनुसार अशी तक्त्यामध्ये माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. ती जशी उपलब्ध आहे त्याच स्वरुपात देणे अभिप्रेत आहे. तरीही तक्त्यामध्ये माहिती पुरविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

६) वरील सर्व बाबीवरुन असे दिसून येते की तक्त्यामध्ये माहिती उपलब्ध नसताना तयार करुन अपिलार्थीस देण्याचा त्याचप्रमाणे प्रथम अपिलाच्या वेळी नव्याने उपस्थित केलेल्या मुद्दयावरची माहिती देणे अपेक्षित नसताना सकारात्मक भूमिका घेऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या पहिल्या व्दितीय अपिलामध्ये तसेच या व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती अपूर्ण, विसंगत व दिशाभूल करणारी मिळाली आहे, ही बाब मोघमपणे पुन्हा पुन्हा उपस्थित केली आहे. अपिलार्थीस माहितीचे अभिलेखे पहाणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध करुन दिलेले आहेत. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता या टप्प्यावर हे प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**

**दिनांक ३०-११-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राऊतराव रामराव लालुजी, ४३, 'पितृछाया', लालबहादुर शास्त्री नगर, भाग्यनगर जवळ, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, पिपल्स कॉलेज, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पिपल्स कॉलेज, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कामाजी तुकाराम बनसोडे,<br>व्दारा, ४३, 'दिपज्योती', उल्हासनगर, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड - ०५ | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कामाजी तुकाराम बनसोडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड (पद रिक्त) | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड - श्री. के. बी. जक्कल | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष : श्री. तुळशीराम पोकलवार, श्री. लक्ष्मण उत्तरवार, श्री. एकनाथ महाजन, श्री. विष्णू सोमेवाड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व सर्व त्रयस्थ अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा दिनांक ०८-१०-२००९ चा माहितीचा अर्ज दिनांक २०-१०-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयास पोस्टाने प्राप्त झाला आहे. त्यामध्ये भोकर तालुक्यातील रॉकेल विक्रेत्याबाबतची सविस्तर माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००० ते ३१ मार्च २००९ असा आहे.

दिनांक ३०-१०-२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रुपये १२३२२ /- इतक्या शुल्काचा भरणा करावा असे सांगितले. अपिलार्थीस पत्र प्राप्त झाले. दिनांक ०९-११-२००९ रोजी अपिलार्थीने माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर यांनी दिनांक ०४-१२-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी पैसे भरुन माहिती घेऊन जावी. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना शुल्काचा भरणा करण्याकरिता लिहिलेले पत्र त्यांच्या घरच्या पत्त्यावर प्राप्त झाले तथापि ते त्यांनी घेतले नाही ते त्यांच्या मित्राने घेतले. त्याचप्रमाणे प्रथम अपिलाच्या वेळी शुल्काचा भरणा करावा असा निर्णय घेतल्याचे पत्र त्यांना दिनांक १०-११-२००९ रोजी प्राप्त झाले. हे पत्र उशीराने प्राप्त झाल्यामुळे व प्रथम अपील यापूर्वी झाले असल्याकारणाने विनामूल्य माहिती द्यावी. तसेच अपिलार्थी हे दारिद्र्यरेखालील नाहीत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नसल्याकारणाने त्यांना माहिती सशुल्क उपलब्ध होईल. तरी अपिलार्थीस माहितीची आवश्यकता असल्यास सदरच्या शुल्काचा भरणा एका महिन्याच्या आत अपिलार्थी यांनी करावा व माहिती प्राप्त करुन घ्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यास माहितीच्या प्रती त्यांना नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ३०-११-२०११**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, व्दारा, ४३, 'दिपज्योती', उल्हासनगर, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जगन्नाथ छोटुराम भगुरे, : अपिलार्थी
वनस्पतीशास्त्र विभाग, सायन्स कॉलेज,
नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जगन्नाथ छोटुराम भगुरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड<br>- ॲड श्री. गोपाळराव औंढेकर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड<br>- डॉ. श्री. व्यंकटेश आर. काब्दे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पाठविली आहे. तथापि अपिलार्थी यांना त्यांच्या अर्जान्वये जे नऊ मुद्दे उपस्थित केले आहेत त्याची संपूर्ण माहिती मिळाली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासोबत जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत नसल्यामुळे कागदपत्रे अपूर्ण होतात. त्यामुळे अपिलार्थीने दाखल केलेले प्रथम अपील विचारात घेता येत नाही असे अपिलार्थीस कळविले आहे. या प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा सचिव, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड यांनी अपिलार्थीने मागितलेल्या मूळ अर्जातील उपस्थित केलेल्या एकूण ९ मुद्दयावर माहितीचा एक संच पुन्हा पाठविणे योग्य राहील. त्याचप्रमाणे जी माहिती त्यांच्या अभिलेख्यात उपलब्ध आहे ती पाठविणे योग्य ठरते, जी उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे कळविण्यात यावे. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये काही माहिती अपूर्ण आढळून आल्यास अपिलार्थी यांनी १५ दिवसाच्या आत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल करावे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर मुद्देनिहाय दोन्ही बाजू ऐकून घेऊन निर्णय देण्याची व्यवस्था करावी. या प्रक्रियेमुळे या माहितीच्या अर्जावर जलद निपटारा होणे शक्य होईल. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील निर्णयावर समाधान न झाल्यास अपिलार्थी नियमानुसार आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ छोटुराम भगुरे, वनस्पतीशास्त्र विभाग, सायन्स कॉलेज, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. क्षीरसागर मोतीराम तुकाराम,<br>देवकृपा अपार्टमेंट, गोकुळनगर, नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. क्षीरसागर मोतीराम तुकाराम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून (म.), तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड - श्री. देसाई जी. एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड<br>- श्री. संतोष वेणीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये वितरण व्यवस्थे अंतर्गत अर्धापूर तालुक्यामधील सर्व गावांच्या दक्षता समितीच्या अहवालाच्या प्रती माहे जून २००९ ते नोव्हेंबर २००९ या कालावधीच्या मागितल्या आहेत. माहिती सरळ सोपी आहे तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिलेला नाही व आतापर्यंत माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (म.), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीस त्यांच्या स्तरावरील माहिती देऊन प्रत्येक गावपातळीवर तलाठी माहिती अधिकारी असल्यामुळे अपिलार्थीचा माहितीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) प्रमाणे तलाठी यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते किंवा अपिलार्थीस परस्पर अर्ज करावा असे कळविणे आवश्यक होते, तथापि या दोनही बाबी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या नाहीत, याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. याकरिता आयोगाचे असे निदेश आहेत की, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने तालुका स्तरावरील दक्षता समितीच्या अहवालाच्या प्रती पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थीस पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही न केल्यामुळे आता एक विशेष बाब म्हणून माहिती संबंधित सर्व गावातील तलाठी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी अपिलार्थी यांना पाठवतील याची तहसीलदार, अर्धापुर यांना स्वत: दक्षता घ्यावी लागेल.

संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे ते शास्तीस पात्र ठरत आहेत यामुळे त्यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, नांदेड यांचेमार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामील करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, नांदेड यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. तहसीलदार, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली तालुका स्तरावरील माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच

पंधरा दिवसाच्या आत व गावपातळीवरील माहिती साठ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य प्राप्त होईल, असे पहावे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. क्षीरसागर मोतीराम तुकाराम, देवकृपा अपार्टमेंट, गोकुळनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (म.), तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद मतीन स. गफार मुदखेडकर, : अपिलार्थी
रा. विठ्ठलनगर, नायगांव बाजार, तालुका नायगांव खै.,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, नायगांव,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, नायगांव, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड - श्री. यमलवाड आनंदा रामचंद्र | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड - श्री. सोनटक्के महादु किशनराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०२-२०१०
फेरसादर दिनांक
२६-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २३-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये गतीमान विकास पाणलोट कार्यक्रम अंतर्गत सन २००८-०९ मध्ये केलेल्या कामाच्या मापन पुस्तीकेनुसार बांधाची व ड्रेनची लांबी गावनिहाय व बाबनिहाय व खर्च तसेच कृषि पर्यवेक्षक, कृषि सहायक निहाय, सज्जा निहाय माहिती देणे अशी माहिती मागितली होती. माहितीच्या प्रती पाठविण्याकरिता त्यांच्या कार्यालयास अनुदान उपलब्ध नव्हते.

माहिती २००८-०९ सालातील असल्याकारणाने ती एकत्रित करुन संकलीत करण्यास काही कालावधी लागला त्यामुळे अपिलार्थीस माहिती कलम ७ (१) प्रमाणे विनामूल्य देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी घेऊन दिनांक १४-०१-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अनुदान उपलब्ध होताच अपिलार्थीस झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात तसेच अपिलार्थीस पाहण्यासाठी माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. प्रथम अपील सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. त्यांनी माहिती पाहण्यासाठी प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या प्रतीचा एक संच आयोगापुढे आणला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांच्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली व त्यांनी आज रोजी सोबत आणलेली माहिती विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीचा एक संच अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद मतीन स. गफार मुदखेडकर, रा. विठ्ठलनगर, नायगांव बाजार, तालुका नायगांव खै., जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. सविता धोंडीराम राचमाळे, : अपिलार्थी
अभिनवनगर, कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
यशवंत सहकारी सूत गिरणी व रोटो गिरणी मर्या., शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह संचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>यशवंत सहकारी सूत गिरणी व रोटो गिरणी मर्या., शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०८-२००९ च्या माहिती अर्जान्वये त्यांची स्वतःची यशवंत सहकारी सूत गिरणी व रोटो गिरणी मर्या., शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांचे सभासदत्व कोणत्या कागदपत्राआधारे देण्यात आले याबाबतची माहिती आठ दिवसात मागितली आहे असे दिसून येत आहे.

अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या सूत गिरणीचे सभासद दिसून येत आहेत व सभासदांना ही माहिती मिळू शकते. अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी या माहितीकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ चा आधार का घेतला ही बाब कळू शकली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली व आठ दिवसाच्या आत विनाशुल्क माहिती देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली नाही असे कागदपत्रावरुन दिसून येते. याकरिता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार आदेशित केल्यानंतर का देण्यात आली नाही याची चौकशी सह संचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांनी त्यांच्या स्तरावर करावी व अपिलार्थीस माहिती देण्याची व्यवस्था करावी. तसेच विलंबाबाबत चौकशी करुन संबंधित अपचारी अधिकारी / कर्मचा-याबाबत प्रशासकीय कार्यवाही योजावी असे आयोगाचा निर्णय आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांनी वर निर्णयात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ३०-११-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सविता धोंडीराम राचमाळे, अभिनवनगर, कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, यशवंत सहकारी सूत गिरणी व रोटो गिरणी मर्या., शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वडजे माधवराव रामराव, : अपिलार्थी

जिल्हा सहसचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, मु. खंडगाव (हा.), तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून (पुरवठा-लेखा), तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड - श्री. एम. आर. सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड - श्री. संदीप कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अर्जदार श्री. वडजे माधवराव रामराव रा. खंडगांव हमीद, तालुका कंधार यांनी दिनांक ०४-११-२००९ रोजी अर्ज देऊन त्यांनी दिनांक २४-०९-२००९ रोजी दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती मागितली आहे. माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक ०७-१२-२००९ रोजी अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक ०८-०१-२०१० व दिनांक १६-०१-२०१० रोजी सुनावणीच्या तारखा ठेऊन अपिलार्थी व माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांचे तोंडी म्हणणे ऐकून घेऊन दिनांक २०-०१-२०१० रोजी अपिलाचा निकाल देण्यात आला आहे. सदर अर्जदारांनी सर्वप्रथम दिनांक ०१-१२-२००६ रोजी माहिती अधिकाराअंतर्गत अर्ज दिला. त्यावेळी तत्कालीन तहसीलदार यांचे आदेशानुसार सन २००४, २००५, २००६ च्या अन्नधान्य वाटप रजिस्टरच्या प्रती व बी. पी. एल. अंत्त्योदय लाभधारकांच्या याद्या विनामूल्य देण्यात आल्या पुन्हा त्यांनी दिलेल्या अर्जातील माहिती झेरॉक्स करणेसाठी ४ लाख रुपये आर्थिक तरतुदेची मागणी मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांच्याकडे करण्यात आली. मा. जिल्हा पुरवठा अधिकारी कडून कंधार, लोहा, बिलोली, अष्टूर या तालुक्यासाठी ८ लाख रुपयांची आर्थिक तरतूदीसाठी वरिष्ठांकडे ग्राहक संरक्षण विभाग मुंबई पत्रव्यवहार केला. दिनांक २२-०१-२००७ च्या अपिलाचे निकालात तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार श्री. के. जी. कदम यांनी माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. पारपेली यांना माहिती (२७) दिवस उशिरांनी दिली म्हणून अधिकार नसतांनाही ६२५० रुपये दंड लावला व नायब तहसीलदार (पुरवठा) तथा माहिती अधिकारी यांनी तो दंड चालन क्रमांक २ दिनांक ०२-०५-२००९ रोजी माहिती अधिकार कायद्याचे अज्ञानामुळे भरणा केला आहे.

सदर अर्जदार यांना पुनश्च माहे एप्रिल २०१० मध्ये कार्यालयात बोलावून तात्कालीन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. एच. पी. चव्हाण यांनी पुरवठा विभागाचे संपूर्ण अभिलेखे त्यांना जवळ जवळ ४ तास दाखवले. सदर रेकॉर्ड पाहून माझे समाधान झाले व आता माझी माहिती मिळणेबाबत माझी काहीही तक्रार नाही असे अर्जदाराने या कार्यालयास लिहून दिले आहे. अर्जदारांची सद्यस्थितीत काही तक्रार नाही तरी कृपया अपील निकाली काढावे ही नम्र विनंती.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीचे संपूर्ण अभिलेखे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले असे दिसून येते. अपिलार्थीस माहिती मिळाली आहे तथापि माहिती चुकीची व अपूर्ण पाठविली आहे असे त्यांनी व्दितीय अपिलामध्ये मोघमपणे नमूद केले आहे. नेमके नमूद केले नाही. याकरिता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पुरवठा-लेखा), तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांच्याकडे याबाबत नेमके कळवावे म्हणजे उर्वरीत माहिती

पाहणीकरिता उपलब्ध करुन देता येईल. आयोगास असेही दिसून आले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार नाहीत. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांना रुपये ६२५० दंड या प्रकरणात लावला आहे व त्याचा भरणा त्यांनी केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय देताना तो त्यांना दिलेल्या अधिकाराच्या मर्यादेत राहून देणे आवश्यक आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे नेमके कळवल्यास याबाबतच्या माहितीचे अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वडजे माधवराव रामराव, जिल्हा सहसचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, मु. खंडगाव (हा.), तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पुरवठा-लेखा), तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पवळे जैवंतराव बळीराम, : अपिलार्थी
मु. पो. मरवाळी, तालुका नायगाव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून (पुरवठा प्रशासन), तहसील कार्यालय,<br>कंधार, जिल्हा नांदेड - श्री. आर. एन. पवळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड<br>- श्री. संदीप कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवळे जैवंतराव बळीराम, मु. पो. मरवाळी, तालुका नायगाव, जिल्हा नांदेड.

२.	जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पुरवठा प्रशासन), तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दुमारे साहेबराव आनंदराव, : अपिलार्थी
रा. दहेगाव (साकुर), पो. वानोळा, तालुका माहूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय,
माहूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक वनसंरक्षक (जंकाससं), किनवट, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३९० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०-११-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय,<br>माहूर, जिल्हा नांदेड - श्री. संभाजी ईरबाजी भंडारे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जंकाससं), किनवट, जिल्हा नांदेड<br>- श्री. चंद्रशेखर देविदास सरोदे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-०५-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०६-२००९
फेरसादर दिनांक
१८-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २७-०२-२००९ च्या माहिती अर्जान्वये सन २००५ ते २००८ या कालावधीतील विभागाअंतर्गत विविध विकास कामाबाबत विस्तृत अशी कामाची एकूण रक्कम, अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, परिपत्रक, मजुरीचा दर, कुपन्स, इत्यादीबाबतची माहिती मागितली आहे. तसेच शेत सर्व्हे नंबर ७३ चा टोच नकाशा, गाव नमुना ७ आणि १२ यांची झेरॉक्स प्रत मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार अपिलार्थीस विहित मुदतीत म्हणजे दिनांक १२-०३-२००९ रोजी सदरच्या कागदपत्रासाठी रुपये १६७०० इतक्या रकमेचा चलनाव्दारे कोषागारात भरणा करावा म्हणजे मागितलेली माहिती पुरविणेबाबत कार्यवाही करण्यात येईल असे कळविले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस सर्व्हे नंबर ७३ बाबतची कागदपत्रे दिनांक २३-०४-२००९ रोजी खास दुतामार्फत पुरविण्यात आली होती तथापि अपिलार्थी हे अर्जात दिलेल्या पत्त्यावर उपस्थित नव्हते. तसा पंचनामा अहवाल केला असून त्याच्या प्रती दप्तर दाखल आहेत. अपिलार्थी यांनी शुल्क भरण्यास आतापर्यंत प्रतिसाद दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकाससं), किनवट, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १५-०५-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिका-याने अर्जदारास विनामूल्य माहिती सात दिवसाच्या आत द्यावी. हा निर्णय घेण्यापूर्वी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, त्याचा विस्तृत कालावधी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्काचा भरणा करण्याकरिता कळविले आहे या बाबी विचारात घेऊन निर्णय देणे आवश्यक होते. तसे तत्कालीन जन अपिलीय अधिका-याने केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या दिनांक ११-०६-२००९ च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-११-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दुमारे साहेबराव आनंदराव, रा. दहेगाव (साकुर), पो. वानोळा, तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकाससं), किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.